मूल्य ₹ २५/-

# हसती दुनिया
(मराठी)

अंक २ • वर्ष २१ वे • पृष्ठे ५२ • फेब्रुवारी -२०२४



# हसती दुनिया
मराठी

अंक २ • वर्ष २१ वे • पृष्ठे ५२ फेब्रुवारी-२०२४

बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)



मुख्य संपादक
**डॉ. विजय शर्मा**

संपादक
**राजेंद्र थोरात**
(अवैतनिक)

सजावट व चित्रे
**उदय सत्यवान पांगे • राजनंदन कृ. पिंपळकर**
**श्रीकांत द. पाटील • रोहित कि. खुडे**



मुद्रक व प्रकाशक, राकेश मुटरेजा यांनी संत निरंकारी मंडळ, दिल्ली-९ करीता एच.टी. मीडिया लिमिटेड, प्लॉट नं.८, उद्योग विहार, ग्रेटर नोएडा-२०१३०६ (उ.प्र.) येथे छापून संत निरंकारी सत्संग भवन, संत निरंकारी कॉलनी, दिल्ली-११०००९ येथे प्रकाशित केली.



कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
E-mail : hduniya.marathi@nirankari.org
Website : www.nirankari.org




लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही



मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९


## स्तंभ


| | |
|---|---|
| दोन शब्द | ०४ |
| विचारपुष्प | १० |
| दादाला विचारु या | १३ |
| शब्दकोडे | १४ |
| सवय ते संस्कार : प्रदूषण... | २४ |
| दिव्यवाणी | २५ |
| वाढदिवसाच्या शुभेच्छा | २६ |
| हसा मुलांनो हसा | ३० |
| अवकाश विज्ञान | ३४ |
| सामान्य ज्ञान | ३६ |
| आरोग्याचा मंत्र | ३७ |
| महाराष्ट्राच्या जलवाहिन्या | ४८ |




## विशेष व प्रेरक प्रसंग


- विशेष : ताज महोत्सव १२
- दिनविशेष : मराठी भाषा दिवस १५
- भ्रमंती : थाळनेरचा किल्ला २८
- कुतुहल : विमानाचा रंग पांढराच.. २९
- दिनविशेष : शिवरायांचे कैसे बोलणे ३२
- प्रेरक प्रसंग : माणुसकीचं दर्शन ४४
- व्यक्तिविशेष : सरोजिनी नायडू ४५
- विशेष : नेतृत्व पुरस्कार ४६





## कला


- ओरिगामी कला २३
- चित्र पूर्ण करुन रंग भरा ५०


## कथा



- श्री गणेश जन्मकथा ०५
- प्रार्थनेची शक्ती ०८
- ईश्वराचे आभार का मानावेत? २०
- माणुसकीचा ओलावा २१
- चतुर कबुतर ४२





## कविता


- श्रीमान रायगडा ०७
- महती 'हसती दुनिया' ची २७
- संत गाडगेबाबा ४७


## चित्रकथा


- चित्रकथा १६
- किट्टी ३८



# विचारांची शक्ती

मित्रांनो, नवीन वर्षात आपण नवे नवे संकल्प करतो. सुरुवातीला खूप उत्साह असतो; परंतु नंतर मात्र तो उत्साह ओसरु लागतो. काय कारण असावं बरं ? कंटाळा की वेळ मिळत नाही ? असं काहीही नाही. याला एकच कारण आहे, ते म्हणजे आपले विचार! आपल्याला हे काही जमणार नाही, यात खूप वेळ जातो, इतर कामं कशी होणार, असे अनेक नकारात्मक विचार आपल्या संकल्पावर पाणी सोडायला भाग पाडतात. म्हणूनच संत महापुरुष, विचारवंत म्हणतात, नेहमी सकारात्मक विचार करावा. आपण स्वत:विषयी जसा विचार करतो तसे आपण घडत जातो. कारण विचारांमध्ये खूप मोठी शक्ती असते. बऱ्याचदा आपल्याला असं ऐकायला मिळतं, की तुला हे नाही जमणार, सांभाळ बरं, पडशील! यामुळे आपला उत्साह, आत्मविश्वास डळमळू लागतो आणि आपली कुवत असूनही आपण मागे पडतो; परंतु या ऐवजी जर असं म्हटलं गेलं, की 'नीट लक्ष ठेवलंस, तर तू पडणार नाहीस, तू हे करु शकशील, तुझ्यामध्ये ती योग्यता आहे, स्वत:वर विश्वास ठेव.' या विचारांनीच बळ मिळतं. मी हे करु शकतो हा विश्वास निर्माण होतो.

एकदा पर्वतशिखरावर चढण्याची शर्यत लागली होती. त्यामध्ये अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धा सुरु झाली तेव्हा विद्यार्थ्यांचे पालक खालूनच मोठमोठ्याने ओरडून त्यांना सूचना देऊ लागले. काही विद्यार्थी अर्ध्या वाटेतूनच परत फिरले. त्यामध्ये सर्वसाधारण दिसणारा एक मुलगा ती शर्यत जिंकला. जेव्हा त्याला विचारण्यात आले, की तू हे यश कसं मिळवू शकलास? तेव्हा त्याच्या वतीने आई म्हणाली, "कारण तो मूकबधिर आहे. तो ऐकू शकत नाही आणि बोलू शकत नाही. लोक म्हणाले, त्याचा यश मिळण्याशी काय संबंध आहे ?" त्यावर ती माता म्हणाली, "जेव्हा ही मुलं शर्यतीमध्ये उतरली, तेव्हा बरेच पालक असं म्हणत होते, की तुला हे जमणार नाही, सांभाळ, पडशील, अशा सूचना देत होते; परंतु याला ऐकू येत नसल्यामुळे इतरांच्या नकारात्मक शब्दांचा त्याच्या मनावर परिणाम झाला नाही. मी सुरुवातीपासूनच त्याला प्रोत्साहन देत आले आहे. त्याने मनाशी केलेला दृढ निश्चय आणि सकारात्मक विचार यामुळेच तो यशस्वी होऊ शकला."

इतर लोक आपल्याबद्दल जे बोलतात किंवा मतं मांडतात तेच आपण खरं मानतो आणि तसेच आपण आहोत असं समजू लागतो; परंतु एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की आपण ईश्वराचे अंश आहोत. ईश्वर ऊर्जावान आहे. सर्वशक्तिमान आहे, सर्वगुणसंपन्न आहे, तर मग त्याचाच अंश असणारे आपण दुर्बल कसे असणार ?

- राजेंद्र थोरात
hduniya.marathi@nirankari.org



# श्री गणेश जन्मकथा

पुराणातील ही कथा आहे. भगवान श्रीशंकर आणि माता पार्वती यांचा निवास कैलास पर्वतावर होता. एके दिवशी प्रात:काळी भगवान शंकर विहार करायला गेले होते. माता पार्वतीला स्नानाला जायचं होतं. तिने मातीचा एक पुतळा बनवला. त्याच्यामध्ये प्राण फुंकला. त्याचं नाव गणेश असं ठेवलं. माता पार्वतीने गणेशाला आज्ञा केली, "बाळ गणेश, मी स्नान करुन येईपर्यंत कोणालाही आत सोडू नकोस." माता पार्वतीचा हा पुत्र मातेला म्हणाला, "माते, मला खूप भूक लागलीय. कहीतरी खायला दे." मातेने त्याच्या आवडीचे पदार्थ लाडू, मोदक दिले. गणेशाने ते पदार्थ पोटभर खाल्ले. नंतर बाळ गणेश हातात भाला घेऊन पहारा द्यायला म्हणून उभा राहिला. थोड्याच वेळात भगवान शंकर नंदीवर स्वार होऊन आले; परंतु गणेशाने त्यांना आत सोडले नाही. नंदी म्हणाला, "हे

बालक, तू प्रत्यक्ष भगवान श्रीशंकरांना अडवण्याचं धारिष्ट्य दाखवतोस ?" त्यावर गणेश म्हणाला, "मला पार्वती मातेचा आदेश आहे, कोणालाही सोडू नकोस म्हणून!" नंदीने नाना प्रकारे समजावून देखील गणेश ऐकायला तयार नव्हता. तेव्हा नंदीने त्याला युध्दाचे आव्हान दिले. गणेशाने नंदीला पराभूत केले. या गोष्टीचा भगवान शंकरांना क्रोध आला. गणेशाने श्री शंकरांशीही युध्द केलं. त्यात श्री शंकरांनी त्रिशूलाने त्याचं मुंडकं उडवलं. बाळ गणेशाची ती अवस्था पाहून माता पार्वती आक्रोश करु लागली. ब्रह्मादि देवही घाबरले. त्यावेळी श्री शंकरांनी आपल्या गणांना आदेश दिला, की प्रात:काळी जो जीव कैलासावर आढळेल, त्याचे शिर घेऊन या.

दुसऱ्या दिवशी कैलासावर एक हत्तीचं पिलू येतांना दिसलं. श्रीशंकरांच्या गणांनी त्या हत्तीचं शिर कापून आणलं. भगवान श्री शंकरांनी ते शिर अभिमंत्रित करुन बाळ गणेशाच्या धडाला लावलं. सर्व देवी-देवतांनी गणेशाला आपल्या शक्ती, विविध आयुधे देऊन खूप खूप आशीर्वाद दिले. अशा प्रकारे माघ शुध्द चतुर्थीला श्रीगणेशाचा जन्म झाला. आज सर्वत्र १३ फेब्रुवारी २०२४ रोजी गणेश जयंती साजरी होत आहे.

ही कथा ऐकून अनेकांना प्रश्न पडतो, की भगवान श्री शंकरांनी गणेशाचं धडावेगळं केलेलं जे शिर होतं, तेच त्याच्या धडाला का जोडलं नाही ? त्या विषयी एक कथा सांगितली जाते.

एकदा दुर्वास ऋषी विष्णू लोकातून परत येत असताना त्यांना इंद्रदेव ऐरावत नावाच्या हत्तीवर स्वार होऊन जाताना दिसला. दुर्वास ऋषींनी इंद्रदेवाला भगवान श्री विष्णूंनी दिलेला फुलांचा हार भेट दिला. इंद्रदेवाने तो पुष्पहार ऐरावताच्या गळ्यात घातला. स्वयं भगवान श्री विष्णूंनी दिलेला आणि कधीही न कोमेजणारा तो फुलांचा हार इंद्राने हत्तीच्या गळ्यात घातलेला पाहून दुर्वास ऋषींचा राग अनावर झाला. या अनमोल हाराचा इंद्रदेवाने अपमान केला म्हणून त्यांनी इंद्रांला शाप दिला, की तू शक्तीहीन होऊन पडशील. इंद्रदेव शक्तीहीन झाल्यावर दुर्वासांनी ऐरावताला आदेश दिला, की तू आता बालरुप घेऊन कैलासावर जा. तिथं तुझं कल्याण होईल. भगवान श्री शंकरांच्या कृपेने तुझं नेहमी पूजन होत राहील. दुर्वास ऋषींच्या आदेशाप्रमाणे बालरुपातील ऐरावत हत्ती कैलासावर पोचला. याच ऐरावताचं शिर गणेशाच्या धडाला जोडण्यात आलं.

गणेशाचं मानव रुपातील जे शिर होतं ते प्रत्यक्ष भगवंताला ओळखू शकलं नव्हतं. उलट युध्द करायला प्रवृत्त झालं. त्यामुळे अज्ञान आणि अहंकाराने भरलेल्या त्या शिराचा भगवंताला नाश करावा लागला.

हत्तीचं विशाल शिर हे विद्येचं आणि बुध्दिमत्तेचं प्रतीक मानलं जातं. ❖

जर परमात्म्याची कुठलीही जात नाही तर त्याची संतान असलेल्या मानवाची कुठली जात असणार आहे ! सूर्याची जात नसते. मग त्याच्या किरणांची जात कशी असेल? एकतेचं रुप तेच पाहू शकतात, ज्यांनी एक प्रभू-परमात्म्याला जाणलेलं आहे. निसर्गातील अनेकतेत सौंदर्य आहे; परंतु मानवाने अनेकतेला अभिशाप बनवून ठेवले.

- बाबा हरदेवसिंहजी महाराज

# श्रीमान रायगडा

मनी फुटले रोमांच जेव्हा, तुझ्या चरणी ठेवीला माथा...
सांग ना रे... श्रीमान रायगडा, मला माझ्या शिवरायाची गाथा....

शिवनेरीचा शान तो, राजगडाचा तो मान....
स्वराज्याची राजधानी करुन, तुझा वाढविला सन्मान....

रायरीच्या कणाकणाने, घातली आर्ततेने साद....
की रायरेश्वराने दिली, त्यांना वात्सल्याची हाक....


का ? राजाने धाव घेतली, का ? घेतली तुझी आस
इथेच कसा घडविला, राजाने थोर नवा इतिहास....

कुठले ते पुण्य रायगडा, काय रे ? तुझे संचित....
कसे बोलविले माझ्या राजाला, सांग ना रे, ते गुपित....

ते ईश्वर... तू दुर्गेश्वर, तू थोर... अन् ते महान....
तुमची प्रथम भेट वर्णीतो, अखंड सारा हिंदुस्तान...

कविता केशवराव शिंदे (नाशिक)





# प्रार्थनेची शक्ती

सहा वर्षाच्या प्रियाला हृदयाचा मोठा आजार झाला होता. तिचे आई बाबा तिला डॉक्टरांकडे घेऊन आले. तिची तपासणी केल्यानंतर डॉक्टरांना असं आढळून आलं, की प्रियाच्या हृदयातील रक्त खूपच कमी झालेलं आहे. त्यांनी इतर डॉक्टरांचाही सल्ला घेतला. सर्वांचं एकच मत पडलं, की प्रियाची जगण्याची शक्यता खूप कमी आहे. डॉक्टर प्रियाच्या आईबाबांना म्हणाले, प्रिया तीन महिन्यांपेक्षा जास्त जगू शकणार नाही. तिच्या हृदयाचं ऑपरेशन करावं लागेल.

आई-वडील भावूक होत म्हणाले, "डॉक्टर! प्रिया आमची एकुलती एक मुलगी आहे. तुम्ही लगेच ऑपरेशनची तयारी करा; पण प्रियाला वाचवा."

ऑपरेशनच्या पाच दिवस आधी प्रियाला दवाखान्यात दाखल करण्यात आले. आता प्रियाचा डॉक्टरांशी रोज संवाद होऊ लागला, त्यामुळे डॉक्टरांनाही प्रियाबद्दल आपलेपणा निर्माण होऊ लागला. प्रियाच्या आईचा तर देवावर खूप विश्वास होता. ती रोज सकाळ-संध्याकाळ देवाकडे प्रार्थना करत होती. प्रियाला धीर देताना

ती हेच सांगायची, “बाळ, काळजी करु नकोस. देव लहान मुलांच्या ह्रदयातच राहतो. तो तुला काहीही होऊ देणार नाही.”

प्रियाला ऑपरेशनला घेऊन जाताना डॉक्टर म्हणाले, “बेटा, काळजी करु नकोस, ऑपरेशननंतर तू अगदी ठणठणीत बरी होशील.”

प्रिया म्हणाली, “डॉक्टर काका, मी अजिबात घाबरत नाही, कारण मला माहीत आहे, माझ्या ह्रदयात देव राहतो; पण जेव्हा तुम्ही ऑपरेशन करताना माझं ह्रदय उघडाल ना, तेव्हा तुम्हाला देव दिसेलच, मग मला सांगाल ना देव कसा दिसतो ते!” तिचं बोलणं ऐकून डॉक्टर हसले आणि त्यांनी ऑपरेशनला सुरुवात केली. डॉक्टरांनी पाहिलं, की प्रियाच्या ह्रदयात तर रक्ताचा थेंब सुध्दा नाही, आता तिला वाचवणं अशक्य आहे. त्यांना प्रियाचे ते शब्द आठवले, आणि.... रक्ताने भरलेले हात जोडून त्याच क्षणी ते प्रार्थना करु लागले, “हे देवा! मी माझा सर्व अनुभव पणाला लावला; पण या मुलीला वाचवू शकत नाही. जर तू हिच्या ह्रदयात राहत असशील तर तूच काहीतरी कर.” डॉक्टरांच्या डोळ्यातून अश्रू ओघळू लागले. या आधी त्यांनी कधी प्रार्थना केली नव्हती किंवा पेशंटसाठी त्यांच्या डोळ्यात कधी अश्रू आले नव्हते. त्यांची ही पहिलीच अश्रूपूर्ण प्रार्थना होती. त्याचवेळी त्यांच्या सहकारी डॉक्टरांनी त्यांना कोपराने हलवत खुणावलं. पाहतात तर काय..... तिच्या ह्रदयात रक्तप्रवाह पुन्हा सुरु झाला. क्षणभर त्यांचा आपल्या डोळ्यावर विश्वासच बसेना. चाळीस वर्षांच्या कारकिर्दीत हे पहिल्यांदाच घडलं होतं. ऑपरेशन तर यशस्वी झालं; पण या बरोबरच डॉक्टरांचं आयुष्यही बदलून गेलं.

काही तासांनी प्रिया शुध्दीवर आली तेव्हा डॉक्टर तिला म्हणाले, “बेटा! तुझ्या ह्रदयातला देव मला दिसला नाही; पण तो प्रत्येक क्षणी ह्रदयात असतो हे मात्र मला जाणवलं.”

या घटनेनंतर डॉक्टर नेहमीच ऑपरेशनच्या वेळी प्रार्थना करु लागले.

तात्पर्य, प्रार्थनेमध्ये खूप मोठी शक्ती असते. अर्थात प्रार्थनेला प्रयत्नांचीही जोड हवीच. ❖

– मनीषा साळुंखे (मीरा रोड)

## अनमोल वचन

भक्ताची पारख धन-दौलत किंवा श्रीमंतीने होत नाही. जर आपण विचार केला, की अमुक एक महापुरुष अनेक वर्षांपासून सत्संगात येतोय; त्याने ईश्वराचं ज्ञानही प्राप्त केलय म्हणजे आता तो लखपती किंवा करोडपती झाला असेल तर हा आपला भ्रम आहे. भक्ताची वास्तविक पारख त्याच्या भावनेवरुन होत असते. त्याचं जीवन एकरस असतं. तो कधीही दुसऱ्याचा अनादर करत नाही. कुणाचं मन दुखवत नाही. तो सदैव समाधानी असतो. ईश्वराच्या इच्छेत जगतो.

- बाबा हरदेवसिंहजी महाराज



विचारपुष्प

# प्रत्येक क्षणी चांगुलपणा धारण करावा

आपलं जीवन सुखदायी होऊ शकतं. सुखदायी याचा अर्थ शारीरिक दृष्ट्या किंवा आर्थिकदृष्ट्या संपन्नता प्राप्त होणं असा नाही. भक्तांनी स्वत:ला सुख आणि दु:ख या अवस्थेशी कधीच जोडलं नाही. ते नेहमी निर्लेप अवस्थेत राहिले. जीवनात फक्त परमात्म्याचाच प्रभाव त्यांच्यावर राहिला आहे. परमात्म्याला जाणून प्रत्येक क्षणी परमात्म्याच्या ध्यानात ते राहिले. भक्तांनी संतांनी असं कधीच सांगितलं नाही, की भक्तीसाठी आपली दैनंदिन कर्म करु नका किंवा घरादाराचा त्याग करुन एकांतात जाऊन भक्ती करा, कुठलंही काम करु नका असं नाही. तर दैनंदिन कर्तव्य पार

पाडत एक परमार्थाची अवस्था कायम ठेवावी. भक्ती पलायन करण्याचा मार्ग नाही. भक्ती हा नातं तोडून, कामधंदा सोडून करण्याचा विषय नाही. जसं श्वास घेण्यासाठी वेगळा वेळ काढावा लागत नाही, काम करत असताना श्वास चालू असतात. तशी प्रत्येक क्षणी भक्त या परमात्म्याची जाणीव ठेवत असतात. परमात्म्याच्या जाणिवेत असल्याने कोणतंही चुकीचं कर्म घडत नाही.

बालपणी बोलायला शिकवलं जातं; परंतु काय बोलावं आणि काय बोलू नये हे शिकण्यात मात्र संपूर्ण जन्म जातो. एखाद्या वेळी कोणी जर आपल्याला कटू शब्दात बोललं तर त्यावेळी त्याला प्रत्युत्तर न देता शांत राहणं हेच योग्य आहे. त्यामुळे आपल्या मनाचे भाव शुध्द राहतात.

आपल्याला नरदेह मिळाला आहे, तेव्हा आपण स्वत:चंही आत्मकल्याण करायचं आहे आणि आपलं जीवन मानवतेसाठी, परोपकारासाठी लावायचं आहे. नि:स्वार्थ भावनेने जगायचं आहे. आपल्या बोलण्यातही विनम्रता असावी. बालपणी बोलायला शिकवलं जातं; परंतु काय बोलावं आणि काय बोलू नये हे शिकण्यात मात्र संपूर्ण जन्म जातो. एखाद्या वेळी कोणी जर आपल्याला कटू शब्दात बोललं तर त्यावेळी त्याला प्रत्युत्तर न देता शांत राहणं हेच योग्य आहे. त्यामुळे आपल्या मनाचे भाव शुध्द राहतात. कटु बोलणाऱ्याच्या मनाची अवस्था कदाचित ठीक नसेल, त्याला परमात्म्याचा विसर पडला असेल; परंतु आपल्याला परमात्म्याचा विसर पडू नये. ज्याच्या अंतरात जसे भाव असतील तसेच भाव प्रकट होतात. जर आपण रस काढण्यासाठी संत्री घेतली असेल तर संत्र्याचाच रस बाहेर पडणार. तसं, आपल्या अंत:करणात जर प्रेम असेल तर प्रेमच व्यक्त होईल.

एक उदाहरण देखील दिलं जातं. एक गृहस्थ बोटिंग करत असतो. तो डोळे मिटून आपल्या होडीत शांतपणे पहुडलेला असतो. त्याला वाटतं आपल्याला खरी शांती प्राप्त झाली आहे. तो आपल्याच आनंदात असतो; परंतु अचानक त्याच्या होडीला टक्कर लागते. त्याचा क्रोध उफाळून येतो. तो टक्कर मारणाऱ्याला रागाने बोलण्यासाठी उठून बसतो.... पण पाहतो तर काय, त्याची होडी एका खडकाला जाऊन धडकलेली असते.

काही क्षणापूर्वीची त्याची आनंदाची, शांतीची अवस्था बदलून गेली. ती अवस्था तात्पुरती होती. आत जी भावना होती तीच प्रकट झाली. म्हणून सतत परमात्म्याचं ध्यान स्मरण असेल तर चांगुलपणा टिकून राहील. ❖

ज्यांच्या सहवासाने सद्‌गुरु आणि निराकार प्रभूचे स्मरण घडेल अशा संतांचा संग केला पाहिजे.

\- राजमाताजी



# ताजमहोत्सव

ताजमहोत्सव दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात १८ ते २७ फेब्रुवारी दरम्यान आग्रा (उत्तरप्रदेश) येथे ताजमहालाच्या पूर्व दरवाजाजवळील शिल्पग्राम या ठिकाणी साजरा केला जातो. ताजमहालास ऐतिहासिक स्मारकाबरोबरच जागतिक वारसा स्थळाच्या यादीत मानाचे स्थान आहे. ताजमहोत्सव भारतीय संस्कृती, कला, शिल्प त्याचबरोबर संगीत, नृत्याच्या माध्यमातून भारताचे मनोहारी वैभव प्रगट करते. जगभरातून अनेक लोक या महोत्सवाला भेट देतात.

सन १९९२ मध्ये सुरु झालेल्या ताजमहोत्सवाचे हे ३२ वे वर्ष आहे. दहा दिवसीय ताज महोत्सवात गाणी-संगीत, नृत्य, कला-संस्कृती आणि मधुर पाककृतींचा आनंद रसिक घेत असतात. या महोत्सवात सहभागी होण्यासाठी ५० रु. शुल्क ऑनलाईन भरावे लागते.

भारतीय संगीत आणि नृत्य या विविध प्रकारात कथक, भरतनाट्यम, भोजपुरी गायन, अवधी गायन, कव्वाली, तबला वादन, पखवाज वादन, सितार वादन यांचा समावेश असतो.

**ताजमहोत्सवाचे विशेष आकर्षण :**

विविध दालने : देशभरातील अनेक कुशल कारागीर या ठिकाणी आपापल्या कलेचे प्रदर्शन मांडतात. यात दगडाच्या आणि लाकडाच्या कोरीव आणि नक्षीदार वस्तू असतात. तसेच हाताने विणलेले गालीचे, संगमरवरी शोभेच्या वस्तू व तांब्या पितळेच्या वस्तूंचे कला दालन असते. हातमागावर विणलेल्या, जरीकाम केलेल्या बनारसी, तसेच इतर प्रांतातील हातमागाच्या अनेक कपड्यांचेही दालन असते.

**संस्कृती :** या महोत्सवात भारतातील अनेक प्रसिध्द सिने कलाकार, गायक उपस्थित असतात, ते आपल्या कलेद्वारे भारतीय संस्कृतीचे अनोखे रुप दर्शकांसमोर प्रस्तुत करतात.

**खाद्य पदार्थ :** देशभरातील अनेक प्रकारच्या खाद्य पदार्थांची मोठी रेलचेल इथं असते. या महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे विविध प्रकारचे पेठे, पराठे, दालमोट, शवर्मा आणि बेदई होय.

**मस्ती मेला :** बालगोपाळांसाठी अनेक मनोरंजनाची साधने इथे उपलब्ध असतात. उंच जाणारे झोके, रोलर कोस्टर, फेरीस व्हील इ. सारखी आधुनिक खेळणीही असतात.

ताजमहोत्सव हा भारतीय सभ्यता, संस्कृती आणि ताजमहालने अमरत्व प्रदान केलेल्या प्रेमाचा चिरस्थायी वारसा यांचा उत्सव असतो. ❖



# दादाला विचारु या..!

## प्रश्न आपल्या मनातले, उत्तर सद्गुरु बाबाजींचे

**प्रश्न : असं म्हटलं जातं, की मन शुध्द केल्याशिवाय ईश्वरप्राप्ती होत नाही, मग सर्वसाधारण जीवांनी भक्ती कशी करावी ?**

**उत्तर :** ईश्वरप्राप्तीचा अधिकार प्रत्येक मानवप्राण्याला आहे. जो मनाचा अभिमान दूर सारुन पूर्ण शरणागत होऊन गुरुचरणी येतो त्याला ईश्वरप्राप्ती होऊ शकते. राहिला प्रश्न मनाच्या शुध्दतेचा, जसं, अस्वच्छ कपडा धुण्यासाठी स्वच्छ पाण्याची गरज असते, तसं अस्वच्छ मन धुण्यासाठी पवित्र, निर्मळ परमात्म्याच्या ज्ञानाची, शुध्द पवित्र परमात्म्याच्या सान्निध्याची आवश्यकता आहे. त्याच्याने मन आपोआपच शुध्द होतं. जाती, वर्ण, कुळाच्या अभिमानाचा नाश होतो. निर्मळाशी नातं जोडल्यानेच निर्मळता प्राप्त होऊ शकते. एखादं गटार गंगेला मिळाल्यावर ते गंगेप्रमाणे पवित्र होऊन जातं, तसं शुध्द ब्रह्माशी मनाचं नातं जोडल्याने मलीन मन शुध्द होतं. मनाचं नातं ईश्वराशी जोडलं जाणं हीच भक्ती आहे. भक्तीसाठी कर्मकांडाची आवश्यकता नसते.


**प्रश्न : भक्त असल्याची लक्षणं कोणती ?**

**उत्तर :** बाह्य स्वरुपावरुन एखाद्याला भक्त ठरवणं सर्वथा चूक आहे. भक्ताचा सर्वात मोठा गुण म्हणजे सहनशीलता. कटु बोलणाऱ्यांची तर अजिबात कमतरता नाही; पण विशेषता त्यांना दिली जात नसून ते कटुबोल सहन करणाऱ्याला दिली जाते. समुद्र जसा सारं काही आपल्या पोटात सामावून घेतो तसा भक्तही विशाल हृदयाचा असतो. तो भूतकाळातील घटनाबद्दल शोक किंवा मोह करत नाही आणि भविष्याबाबत चिंतीत किंवा उदास होत नाही. तो कधीही कुणाला तुच्छ किंवा हीन-दीन समजत नाही. तो सतत आपल्या स्वत:मध्ये सुधारणा घडवून आणत असतो. इतरांमध्ये दोष न पाहता त्यांचे गुणच पाहत असतो आणि गुणग्राहक बनत असतो. त्याची वाणी मधुर आणि वर्तन प्रेमळ असतं. तो अंतर्बाह्य एक असतो. भक्त हे बाह्यवेशभूषेचं नाव नाही तर ती एक आंतरिक अवस्था असते.

# शब्द कोडे

# २२७

○ विकास अरोडा (रेवाडी-हरियाणा)




## आडवे शब्द

१. सत्याग्रहासाठी म. गांधींजी .... दांडीपर्यंत ३८५ किलोमीटर अंतर पायी गेले.

५. भारताची पहिली विद्युत रेल्वे.... फेब्रुवारी १९२५ ला मुंबईत कुर्ला ते सी.एस.टी. दरम्यान धावली.

६. इटली देशाची राजधानी

७. युगदृष्टा बाबा हरदेविसंहजी महाराजांच्या विचारांचे पहिले पुस्तक

९. देव याच्या उलट

१०. भगवान शंकरांचे वाहन

११. इराकची राजधानी

१३. रोजच्या जेवणातील एक खाद्य पदार्थ

१४. भारतातील १८ वर्षाच्या नागरिकाला..... दानाचा अधिकार प्राप्त होतो.

## उभे शब्द

२. एक पौष्टिक सुकामेवा

३. श्रीशंकराचे एक नाव

४. लीप वर्षाच्या एकूण दिवसांपैकी ५७ दिवस कमी केले.

६. संत मीराबाईंचे गुरु - संत ......

७. हिंदी / मराठी भाषा या लिपीमध्ये लिहिली जाते.

८. आर्य समाजाची स्थापना महर्षि ..... यांनी केली.

११. बगळा याचा समानार्थी शब्द

१२. जो जाणेल भगवंत, तया नाव बोलिजे....

उत्तरे इतरत्र



# विष्णु वामन शिरवाडकर

# मराठी भाषा दिवस

विष्णु वामन शिरवाडकर म्हणजेच आपले कुसुमाग्रज. मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार व समीक्षक. त्यांनी 'कुसुमाग्रज' या टोपणनावाने काव्यलेखन केले. ते आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ जाणीव असणारे मराठीतले महत्त्वाचे लेखक मानले जातात. सरस्वतीच्या मंदिरातील दैदिप्यमान रत्न असे त्यांचे वर्णन करतात. वि.स. खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्यात ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे ते दुसरे साहित्यिक होते. त्यांचा जन्मदिवस (२७ फेब्रुवारी) हा 'मराठी भाषा दिवस' म्हणून साजरा केला जातो.

कुसुमाग्रजांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांचे मूळ नाव गजानन रंगनाथ शिरवाडकर असे होते. त्यांचे काका वामन शिरवाडकर यांनी त्यांना दत्तक घेतल्याने त्यांचे नाव विष्णु वामन शिरवाडकर असे बदलले गेले. शिरवाडकरांचे वडील शेतकरी होते. कुसुमाग्रजांनी नाशिक येथे आपले शिक्षण पूर्ण केले. बी.ए.ची पदवी मिळाल्यानंतर काही काळ त्यांनी चित्रपट व्यवसायात पटकथा लिहिणे, चित्रपटात छोट्या भूमिका करणे अशी कामे केली. यानंतर सोबत, स्वराज्य, प्रभात, नवयुग, धनुर्धारी अशा विविध नियतकालिकांचे, वृत्तपत्रांचे संपादक म्हणून त्यांनी काम केले. १९३२ साली झालेल्या काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहात त्यांचा सहभाग होता. १९३३ साली त्यांनी ध्रुव मंडळाची स्थापना केली. अनेक सामाजिक चळवळीत, सत्याग्रहांमध्ये सहभाग घेतला. पुढील काळातही त्यांनी नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली.

पत्रकारितेच्या निमित्ताने मुंबईत आल्यावर शिरवाडकरांना मुंबई मराठी साहित्य संघाचे डॉ. अ.ना. भालेराव भेटले. मराठी रंगभूमीचा सुवर्णकाळ संपून ती मृतप्राय होऊ नये म्हणून झटणारे भालेराव यांनी कवी कुसुमाग्रजांना नाटके लिहिण्यास प्रवृत्त केले. केवळ कवी असलेले वि.वा. शिरवाडकर बघता बघता एक यशस्वी नाटककार झाले.

वि.वा. शिरवाडकर यांच्या स्मरणार्थ नाशिक येथे कुसुमाग्रज प्रतिष्ठान नावाची संस्था उभारण्यात आली आहे.

कुसुमाग्रजांना त्यांच्या साहित्यक्षेत्रातील अमौलिक योगदानाबद्दल त्यांना व त्यांच्या साहित्याला राज्यशासनाचे तसेच भारत सरकारचे अनेक पुरस्कार प्राप्त झाले. इतकेच काय तर अंतराळातील एका ताऱ्यास 'कुसुमाग्रज' हे नाव दिले गेले आहे. ❖

# चित्रकथा


चित्रांकन व लेखन : अजय कालरा









व्यापारी पोलीस पाटलांच्या घरी गेला आणि आपलं गाठोडं हरवल्याचं सांगितलं. पाटील फारच प्रामाणिक व दयाळू वृत्तीचे होते.
ते पैशाचं गाठोडं गावातील पोलीस पाटलांच्या मुलीला सापडलं.
पाटलांनी ते गाठोडं उघडून त्यातील मोहरा मोजल्या. त्या तीस मोहरा निघाल्या.
पाटलांनी ते गाठोडं व्यापाऱ्याला परत केलं. व्यापाऱ्याने ते गाठोडं उघडलं आणि त्यातील मोहरा मोजू लागला.


व्यापाऱ्याच्या मनात लालसा निर्माण झाली; त्याने दहा मोहरा कमी असल्याचे सांगितले.
पाटलांनी त्याला खूप समजावलं पण त्याने त्यांचं काही न ऐकता गाठोडं तिथेच ठेवून तो न्यायालयात गेला.
त्याने घडलेली सर्व हकिकत न्यायाधीशांना सांगितली. न्यायधीशांनी पाटील व त्यांच्या मुलीला बोलावून गाठोड्यात किती मोहरा होत्या त्याबद्दल विचारणा केली.
किती मोहरा गाठोड्यात होत्या ?
तीस
नाही, चाळीस


ह्याचा अर्थ हे गाठोडं व्यापाऱ्याचे नाहीये. जोपर्यंत या गाठोड्याचा खरा मालक भेटत नाही तोपर्यंत हे गाठोडं या मुलीजवळच राहील.
आणि ज्यावेळी एखादे चाळीस मोहरांचे गाठोडे सापडेल त्यावेळी तुला बोलावून घेण्यात येईल.
हे ऐकून व्यापाऱ्याला आपल्या खोटे बोलण्याचा पश्चाताप झाला. तो मोठ-मोठ्याने ओरडू लागला, नाही, नाही माझ्या केवळ तीसच मोहरा हरवल्या आहेत.
परंतु न्यायाधीशांनी त्याचे काहीच ऐकून घेतले नाही. त्याला बाहेरचा रस्ता दाखवला. अशाप्रकारे लालचीपणाचा शेवट हा केवळ दु:खातच होतो.



# ईश्वराचे आभार का मानावेत?

एक लाकूडतोड्या होता. तो खूप गरीब आणि दुर्बल होता. सततचे आजारपण आणि उपासमार यामुळे जीवनाला कंटाळला होता. एके दिवशी जंगलात लाकडं तोडायला जात असताना त्याला एक साधू ध्यानस्थ बसलेला दिसला. बऱ्याच वेळाने साधूने डोळे उघडले. समोर लाकूडतोड्या हात जोडून उभा होता. लाकूडतोड्याने विचारलं,

"महाराज! तुम्ही नेहमी डोळे बंद करुन का बसता?"

साधू म्हणाला, "मी ईश्वराच्या ध्यानात बसतो."

लाकूडतोड्याला नवल वाटलं. त्याने पुन्हा विचारलं, "मग महाराज! तुमचं ईश्वराशी बोलणं देखील होतच असेल."

"होय, ध्यानात असतानाच आम्ही ईश्वराशी संवाद साधत असतो."

"मग माझा एक प्रश्न देवाला विचारल का?"

"हो अवश्य विचारीन. बोल काय आहे तुझा प्रश्न?"

"देवाला म्हणावं, की हे माझं आजारपण, गरिबी, कष्टाचे दिवस कधी संपतील?"

"ठीक आहे, देवाला मी अवश्य विचारीन आणि पुन्हा काही दिवसांनी आल्यावर तुला याचं उत्तर देईन."

उर्वरित पान क्र. २२ वर





# माणुसकीचा ओलावा

रामूकाकांचं रेडीमेड कपड्यांचं छोटंसं दुकान होतं. त्या दुकानामध्ये दोन मुली आणि दोन मुलगे कामाला होते. कोविडचा काळ सुरु झाला. दुकानातील विक्री कमी होऊ लागली. मुलांचा पगार देणं कठीण होऊ लागलं. एक वर्ष गेलं, दोन वर्षे गेली. धंदा तोट्यामध्ये चालला होता. आता नोकर कपात करणं, हा एकच उपाय काकांकडे होता; परंतु ही गोष्ट म्हणजे अशा बिकट परिस्थितीत त्यांच्या पोटावर पाय देण्यासारखी होती. त्यांना कोणत्या तोंडाने सांगावं, की मुलांनो उद्यापासून कामावर येऊ नका म्हणून! या चिंतेने रामूकाकांना रात्रभर झोप आली नाही. शेवटी विचार कर करुन त्यांनी निर्णय घेतला, की चौघांपैकी फक्त एकाला नोकरीवरुन काढावं, त्या चौघांमध्ये सुरेश हा परिस्थितीने थोडा बरा वाटला. कारण त्याचा भाऊ चांगल्या ठिकाणी नोकरीला होता. म्हणून दुसऱ्या दिवशी दुकानात आल्यावर त्यांनी सर्वांना एकत्र बोलावून आपला निर्णय सांगितला. त्यांचा निर्णय ऐकून सुरेश रडवेला झाला. तिघंही खूप अस्वस्थ झाले. शीला म्हणाली, "काका, सुरेशला तर नोकरीची अधिक गरज आहे. कारण त्याच्या मोठ्या भावाचीही नोकरी गेली आणि आईदेखील आजारी असते. म्हणून त्याला तुम्ही कामावरुन काढू नका." रामू काका म्हणाले, "मग काय करावं आता ?

तुम्हीच सांगा." त्यावर सुमन म्हणाली, "काका! तुम्ही आम्हाला जो बारा हजार पगार देता ना, त्या ऐवजी नऊ-नऊ हजार रुपये द्या. आमचे तीन-तीन हजार रुपये कमी करुन ते सुरेशला द्या; पण त्याला कामावरुन काढू नका. आज जी परिस्थिती आहे, ती उद्या नक्कीच बदलणार; परंतु आजच्या काळात प्रत्येकाला थोडी का होईना मदतीची गरज आहे." त्यावर सर्वांनी आपली सहमती दर्शवली. तिन्ही मुलांचा समजूतदारपणा पाहून रामू काकांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. ते म्हणाले, "बाळांनो! कठीण काळातही स्वार्थ बाजूला ठेवून आपण इतरांचा विचार करता, यालाच खरी सहृदयता म्हणतात, हीच खरी माणुसकी आहे. हा माणुसकीचा ओलावा असाच जपत राहा."

कालांतराने परिस्थिती बदलली. दुकानाची भरभराट झाली. मुलंही कष्टाळू होती. ती देखील न कंटाळता दुकानामध्ये अधिक वेळ देऊ लागली. आता मुलांना पगारवाढीबरोबरच बोनसही मिळू लागला. मित्रांनो, स्वतःचा विचार प्रत्येक जण करतो; पण जो दुसऱ्याचा विचार करतो, तोच खरा माणूस! ❖

# ईश्वराचे आभार का मानावेत? (पान २० वरुन)

असं म्हणून साधू पुढच्या मार्गाला निघून गेला. काही दिवसांनी साधू पुन्हा त्या ठिकाणी येऊन ध्यानस्थ बसला. ध्यान संपल्यानंतर समोर पाहिलं, तर लाकूडतोड्या हात जोडून उभा होता.

साधू म्हणाला, "मी तुझा प्रश्न देवासमोर मांडला. तेव्हा देवाने सांगितलं, की अजून दहा वर्ष तरी तुझ्या जीवनात सुख नाही. मग मी विचारलं, देवा! तो भोळा भक्त आहे. तुमच्यावर त्याची खूप श्रध्दा आहे. त्याचं दुःख लवकर संपावं यासाठी काही उपाय नाही का? त्यावर देवाने सांगितलं, हो आहे ना!"


"कोणता उपाय महाराज?" लाकूडतोड्याने उत्सुकतेने विचारले.

"तुझ्या वाट्याला आलेल्या दुःखाबद्दल रडगाणं गाऊ नकोस. प्रत्येक क्षणी ईश्वराला धन्यवादच दे. नेहमी हेच म्हणत राहा, की देवा मला आहे त्या परिस्थितीत आनंदात राहता यावं. हे देवा, तुझे खूप खूप आभार!" लाकूडतोड्या म्हणाला, "ठीक आहे महाराज! जशी देवाची आज्ञा."

दुसऱ्या दिवसापासून लाकूडतोड्या प्रत्येक क्षणी देवाला धन्यवाद देऊ लागला. आज भाकर मिळाली नाही तरीही देवा तुझे आभार! आजारपण आलं तरीही धन्यवाद! असे काही दिवस निघून गेले. आता लाकूडतोड्या नेहमीप्रमाणे दुःखी-कष्टी दिसत नव्हता. साधूला मोठं नवल वाटलं. त्याने देवाला विचारलं, "देवा! तू अशी काय जादू केलीस?" देव म्हणाला,

"जो नेहमी जीवनात आलेल्या भोगांबद्दल तक्रार करत असतो. स्वतःच्याच कर्माची फळं भोगत असतानाही मलाच दोष देत असतो, त्याच्यासाठी मी काही करु शकत नाही; परंतु जो आपल्या वाट्याला आलेले भोग आनंदाने भोगतो. प्रत्येक क्षणी मला धन्यवाद देतो. तेव्हा अशा गुणी भक्तांच्या प्रेमापोटी मला त्याचं दुःख स्वतःकडे घ्यावं लागतं. लाकूडतोड्या देखील दुःख करत न बसता मला मनापासून धन्यवादच देत राहिला. त्यामुळे दहा वर्षांचं दुःख मला दहा दिवसात संपवावं लागलं."

शुकर किये जा तू मालिक का। शुकरानाही भक्ती है।



# ओरिगामी

## बदक

१. एक छानसा जाडसर १० सेमी लांबी-रुंदीचा कागद घ्या. आता दोन्ही टोके जुळवून तिरपा मध्य काढून दोन्ही बाजू मध्यापर्यंत दुमडून घेऊन घडी पक्की करा.

२. वरील बाजूस जो कोन दिसत आहे तो देखील मध्यपर्यंत जोडा.

३. आता दोन्ही घड्या हलक्या हाताने दाबून ठेवा. तयार घडी, घड्यांच्या बाजूवर ठेवून मागील

४. बाजूने दुमडावी.
घडीची बाजू लक्षात घेऊन खालील टोक

५. रिव्हर्स फोल्डने वर घ्यावे.
आता शेपटीचा भाग तयार करण्यासाठी लांब

६. बाजू खालील बाजूस दुमडावी.
शेपटीच्या बाजूने बाहेर दिसणारा भाग आत


७. दुमडावा आणि चोचीच्या बाजूने रिव्हर्स फोल्डने टोक वरील बाजूस दुमडावे.
घडीला एकदा आत व एकदा बाहेर घेऊन

८. डोकं व चोच तयार होईल. आता वरची दोन्ही टोके वरील बाजूस किंचित दुमडून घ्यावी.

झाला आपला बदक तयार! हा बनवण्यास फार सोपा नसला, तरी नीट लक्ष देऊन बनवला तर फारच सुरेख पक्षी तयार होईल.

आपण कागदापासून विविध प्राणी, पक्षी, फुलं व इतर सुरेख गोष्टी बनवू शकतो. ❖

- ऋचा कुमठेकर (कल्याण)



# प्रदूषण आतलं असो, की बाहेरचं...

राजेश शाळेतून घरी चालला होता. त्याच्या कॉलनीच्या पटांगणाजवळ काही मुलं शेंगा खाऊन टरफलं तिथंच टाकत होती. काही मुलांकडे चॉकलेट आणि बिस्किटं होती. त्यांचे रॅपर्स सुध्दा तिथेच फेकत होती. ती सर्व मुलं राजेशपेक्षा वयानं मोठी होती. त्यांनी केलेला कचरा वाऱ्याने इकडे तिकडे उडत होता. राजेशला ते आवडलं नाही. त्याने सर्व कचरा गोळा केला आणि समोरच असलेल्या कचराकुंडीत टाकला. ती मुलं हे सारं काही बघत होती. आपण फेकलेला कचरा आपल्यापेक्षा वयानं लहान असलेला मुलगा उचलून कचराकुंडीत टाकत आहे हे बघून त्यांना आश्चर्य वाटलं. सगळा कचरा कचराकुंडीत टाकल्यावर राजेशने बाजूलाच असलेल्या नळावर स्वच्छ हात पाय धुतले आणि तो आपल्या घराकडे निघाला.

त्यांच्यातीलच एका मुलाने त्याला विचारलं, "मित्रा, तुझं नाव काय?" राजेशने आपलं नाव सांगितलं. त्यावर दुसऱ्या मुलानं विचारलं, ".... पण तू हा कचरा का उचलतोयस? तुला किळस नाही वाटत?" राजेश म्हणाला, "दादा, मी याच कॉलनीत राहतो. आपल्या आजूबाजूला जर असाच कचरा साठत राहिला तर हळूहळू कचऱ्याचा ढीग जमा होईल. पावसाळ्यात तो गटारात जाऊन गटारं तुंबतील. रोगराई वाढेल. मग त्याचा त्रास आपल्यालाच होईल की नाही?" राजेशचं अदबीशीर बोलणं, त्याचा समजुतदारपणा पाहून त्याची टिंगल करायच्या बेतात असलेली ती मुलं आता मात्र पुरती ओशाळली होती. राजेशच्या वागण्या-बोलण्याने प्रभावितही झाली. त्यांनी त्याला विचारलं, "तू एवढं चांगलं बोलायला, वागायला कुठं शिकलास?"

त्यावर राजेश म्हणाला, "मला लहानपणापासून माझे आई बाबा सत्संगाला घेऊन जातात. तिथं मी हे सारं शिकलो. आमच्या सद्गुरुंनी आम्हाला शिकवण दिलेली आहे, की प्रदूषण आतलं असो किंवा बाहेरचं, दोन्हीही हानिकारकच आहेत."

हे ऐकल्यावर मुलं राजेशचं कौतुक करत म्हणाली, "सॉरी हं मित्रा, आम्ही खरंच चुकीचं वागलो, या पुढे आम्ही देखील तुझ्यासारखंच वागू."

पाहिलंत मित्रांनो, छोट्याशा राजेशने आपल्या स्वच्छतेच्या सवयीमुळे सर्व मुलांवर किती मोठा प्रभाव टाकला! एक चांगली सवयच एक चांगला संस्कार बनते आणि नेहमीच कौतुकाचा धनी बनवते.

यासाठीच सद्गुरु माताजी मिशनच्या माध्यमातून स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, स्वच्छ जल-स्वच्छ मन इ. अभियान राबवत आहेत.

चला तर मग, आजपासूनच आपणही सुरुवात करु या.

- कचरा, प्लास्टिकच्या बॉटल्स, पिशव्या, कागदाचे तुकडे इतरत्र न फेकता कचराकुंडीतच टाकू.
- कुठे फिरायला गेलो आणि त्या ठिकाणी अशी व्यवस्था नसेल तर सर्व कचरा आपल्याकडील पिशवीत भरुन ठेवू आणि कचराकुंडी दिसताच तिथं नेऊन टाकू.
- काचेचे तुकडे, धारदार वस्तू जाड कागदात किंवा प्लास्टिक मध्ये गुंडाळून त्यावर चिकटपट्टी लावून मगच कचरा कुंडीत टाकू.ओला कचरा आणि सुका कचरा वेगळा ठेवू. ❖

- रुपाली शिंदे (अंबरनाथ)



# समजदार मनुष्य

दुनियावी दृष्टीने जर पाहिलं, तर मनुष्य खूप समजदार दिसून येतो; परंतु संत-महात्मा समजदार आणि ज्ञानी त्यालाच म्हणतात, जो आत्मकल्याणाच्या दृष्टीने नेहमी जागरुक असतो.

खरा समजदार कोणाला म्हणता येईल यावर आधारित एक उदाहरण दिलं जातं.

एका राज्यात राजाची निवड करण्याचा एक वेगळाच रिवाज होता. त्या राज्यावर राज्य करणाऱ्या राजाचा ठराविक कालावधी संपला, की दुसऱ्या राजाची निवड करताना त्या नगरीमध्ये पहाटे जो कोणी गृहस्थ पहिल्यांदा प्रवेश करील, त्याला राजा बनवले जाई. त्याचा दोन-चार वर्षांचा जो काही कालावधी असेल, तो संपला, की त्या राजाला समुद्राच्या मध्यभागी असलेल्या एका निबिड अरण्यात सोडून देण्यात येई. तिथं भयानक जंगली जनावरांचा सुळसुळाट असे. त्या अरण्यातच त्या राजाचा अंत होत असे.

एकदा अशाच पध्दतीने एका गृहस्थाला राजा म्हणून निवडण्यात आले. तो मात्र खऱ्या अर्थानं समजदार आणि ज्ञानी होता. सिंहासनावर बसताच त्याने पहिला आदेश दिला, की समुद्राच्या मध्यभागी जे घनदाट जंगल आहे, त्यातील काही झाडंझुडपं कापून तिथे निवासाच्या सर्व सुखसोयी निर्माण करा. जंगली जनावरांना पकडून पिंजऱ्यात बंद करा. राजाच्या हुकमाची पालना झाली. सगळ्या सुख-सोयी जंगलामध्ये उपलब्ध झाल्या. जेव्हा राजाचा कार्यकाळ पूर्ण झाला, तेव्हा त्याला त्या निबीड अरण्यात सोडून देण्यात आले; परंतु तिथं तर त्यानं आधीच सगळ्या सुखसोयी निर्माण करुन ठेवल्या होत्या. त्यामुळे त्याचं पुढील आयुष्य अगदी आनंदात गेलं. म्हणून हाती वेळ असतानाच जो अशी व्यवस्था करतो त्याला समजदार म्हटलं आहे.

आयुष्याचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर या आत्म्याचा पुढील प्रवास सुखकर व्हावा म्हणून आपल्या मूळ स्वरुपाची ओळख जिवंतपणीच करुन घेतली, तर आत्म्याला दु:ख भोगावं लागत नाही.

आग लागल्यानंतर ती विझवण्यासाठी कोणी विहीर खणायला लागलं, तर त्याला समजदार म्हटलं जात नाही. तसं जीवनाचा अखेरचा क्षण येण्याआधी आपल्या आत्म्याच्या कल्याणाची व्यवस्था ज्याने केली नाही, त्याला संत महात्मा समजदार म्हणत नाहीत. ❖

# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



समृध्दी देवरुखकर



आयान हुमणे



ध्रुविका जाधव



सेहेजता गुजरे



त्रिपुरा



माहिरा वायकुले



मल्हार पांडुले



राजवीर गव्हाणे



किआन पांडुले



वियान




अनुराग हुमणे



रुहा सुर्यवंशी

# महती 'हसती दुनिया'ची




हसती दुनिया मासिकाला झाली वीस वर्ष,
हे ऐकूनच माझ्या मनाला झाला खूप हर्ष
जीवन बागेला माझ्या, यातील विचारांनी सजवलं,
संपादकांच्या 'दोन शब्दां'नी आयुष्य हे उजळलं
ज्ञानाचं भांडार मजला, खूप खूप मिळालं,
'दादाला विचारुन' माझं, शंका समाधान झालं
सद्‌गुरुच्या सुवचनांना, प्राधान्य जीवनात दिलं,
'विचारपुष्पा'मधून जीवन, सकारात्मक बनलं
'शब्दकोडे' सोडवूनी, ज्ञान माझं वाढलं,
'दिन-व्यक्तिविशेषा' तून, कार्य थोरांचं कळलं
जीवनावश्यक बोध हा 'चित्रकथे' तून कळला,
निरोगी आयुष्यासाठी 'आरोग्याचा मंत्र' मिळाला
'हसा मुलांनो हसा' वाचून खूप खूप हसले
आयुष्याच्या चित्रामध्ये 'रंग आनंदाचे भरले'
गड-किल्ल्यांचा इतिहास 'भ्रमंती' त गवसला,
वैश्विक ज्ञानाचा ठेवा 'सामान्यज्ञानात' सापडला
लेखक-कवींच्या प्रयत्नांना, उदंड यश मिळत राहो,
'हसती दुनिया' सकळांना, अखंड समृध्द करत जावो

योगिता पाटील (खेड)



# थाळनेरचा किल्ला

धुळे जिल्ह्यातील तापी नदीच्या काठी थाळनेर हा पुरातन किल्ला आहे. अनेक राजवटी व त्यांचा वैभवशाली काळ पाहिलेला हा किल्ला ऐतिहासिक ठेवा आहे. थाळनेर एकेकाळी खानदेशाची राजधानी होती. सुरत-बुऱ्हाणपूर या व्यापारी मार्गावरील ते महत्त्वाचे केंद्र होते. लता मंगेशकर यांचे आजोळ म्हणजे मामाचे गाव थाळनेर हेच होते. आता त्यांचा वाडा पूर्ण मोडकळीस आलेला दिसतो.

इ.स. ११२७-२८ मध्ये जिवाजी आणि गोवाजी या गवळी किंवा अहीर कुटुंबाकडे थाळनेरचा ताबा होता. देवगिरीचा राजा बाजीराव ह्याचा मुलगा दौलतराव खानदेशची पाहणी करण्यासाठी आला असता त्याला थाळनेरची भरभराट झाल्याचे आढळले. त्यामुळे खूश होऊन त्याने जिवाजी आणि गोवाजींना थाळनेरचा प्रमुख बनवले.

इ.स. १३७० मध्ये फिरोजशहा तुघलक याने हा प्रदेश जिंकून घेतला आणि मलिकराजा फारुकी याला दक्षिण गुजरातची सुभेदारी बहाल केली. मलिकने थाळनेरला आपली राजधानी बनवली. पुढच्याच वर्षी गुजरातच्या सुलतानने मलिकवर हल्ला करुन त्याचा प्रदेश हिसकावून घेतला, मलिक थाळनेरच्या आश्रयाला जाऊन राहिला.

इ.स.१६०० मध्ये थाळनेरचा ताबा अकबराकडे गेला. त्यावेळी सुरत-बुऱ्हाणपूर या व्यापारी मार्गावर असलेला हा किल्ला अतिशय मजबूत व संपन्न होता. १७५० मध्ये थाळनेरचा ताबा पेशव्यांकडे गेल्यावर त्यांनी तो होळकरांना दिला. इ.स. १८१८ मध्ये ब्रिटीश जनरल सर थॉमस हिसॉप जेव्हा थाळनेरचा किल्ला घेण्यासाठी गेला, त्यावेळी खानदेशच्या इतिहासातील सर्वात रक्तरंजित प्रतिकार त्याला इथे झाला. यात मराठ्याचे २५० सैनिक तर इंग्रजांचे २५ जण ठार झाले.

तापी नदी थाळनेर गावाजवळ नालेच्या (यू) आकाराचे वळण घेते. तेथे असलेल्या १०० मीटर उंच टेकडीवर थाळनेरचा किल्ला वसलेला आहे. आज मात्र किल्ल्याची पाताळेश्वर मंदिराच्या बाजूची ६०

फूट उंच पक्क्या विटांनी बांधलेली भिंत व २ बुरुज उभे आहेत. बाकी सर्व बाजूच्या भिंती व बुरुज नष्ट झालेले आहेत. किल्ल्यावर दोन छोटी देवळं आहेत. एकात सप्तश्रृंगी देवीची मूर्ती आहे. दुसरे देऊळ रिकामे आहे. किल्ल्यात फारसे काही बघण्यासारखे नसले तरी किल्ल्याच्या बाजूला पाहण्यासारखी दोन ठिकाणे आहेत.

जमादार वाडा : गावातून पाताळेश्वर शंकर मंदिराकडे जाताना एक गढी आपले लक्ष वेधून घेते. त्याला स्थानिक लोक जमादार वाडा म्हणतात. या गढीत आजमितीला अनेक कुटुंब राहतात. वाड्याच्या ४ टोकांना विटांनी बांधलेले १२ फुटी बुरुज आहेत. प्रवेशद्वार २० फूट उंच असून त्यावर अणकुचीदार खिळे बसवलेले आहेत. वाड्याचे प्रवेशद्वार, त्यावरील सज्जा लाकडी असून त्यावर सुंदर कोरीवकाम केलेले आहे. वाड्याच्या आतील भागातील घरांच्या दारा-खिडक्यांवरही सुंदर नक्षीकाम आहे. घरातील साध्या खुंट्या, कोनाडे यांच्यावरचे नक्षीकाम गढी बांधणाऱ्यांच्या रसिकतेची कल्पना देते. गढीला तळघर व त्यात उतरण्यासाठी जिना आहे. गढीच्या प्रवेशद्वाराशेजारी रामसिंग व गुमान सिंग ही नावे लिहिलेली दिसतात.

दहा कबरी : थाळनेरवर राज्य करणाऱ्या फारुकी घराण्यातील राजांच्या व महत्त्वाच्या व्यक्तींच्या कबरी थाळनेर गावात आहेत. त्यातील एक मोठी कबर अष्टकोनी असून त्यावर अरेबिक भाषेतील शिलालेख आहे. बाकीच्या कबरी साधारण एकाच मापाच्या (११ फूट x११ फूट) व आकाराच्या आहेत. त्यापैकी चार कबरी १) मलिक राजा, २) मलिक नसिर, ३) मिरान अदील शहा, ४) मिरान मुबारक खान या राजांच्या आहेत.

धुळे -इंदोर महामार्गावर एस.टी.ने थाळनेरला पोचता येते. धुळ्यापासून ६४ किलोमीटर अंतरावर हा किल्ला आहे. ❖

कुतुहल

## विमानांचा रंग हा बहुतांश पांढराच असतो?

पांढरा रंग हा सूर्याची किरणे परावर्तित करतो. त्यामुळे उन्हाळ्यात पांढऱ्या रंगाचे कपडे वापरले जातात हे आपल्याला माहीत आहे. पांढरा रंग उष्णतेचा सर्वोत्तम परावर्तक आहे. उन्हात फिरताना जर आपण काळ्या रंगाचे कपडे परिधान केले तर आपल्याला जास्तच गरम होते!


कारण काळा रंग हा उष्णता शोषून घेतो, तर पांढरा रंग हा उष्णता परावर्तित करतो. म्हणून विमानाचे तापमान मर्यादित ठेवण्यासाठी विमानाला पांढरा रंग दिला जातो. इतर रंग दिला तर सूर्यप्रकाश परावर्तित होणार नाही आणि याचा परिणाम विमानातील अंतर्गत यंत्रणेवर होऊ शकतो. हे लक्षात घेऊन विमानाला शक्यतो पांढराच रंग दिला जातो.

पांढरा रंग हा इतर रंगांच्या तुलनेत खूपच स्वस्त असतो. हा देखील विचार करुन कंपन्या पांढऱ्या रंगाचा वापर करतात. असे सांगितले जाते.

पांढऱ्या रंगामुळे विमानामध्ये झालेला बिघाड किंवा ऑईल गळतीचे प्रकार लवकर लक्षात येतात. या जागी जर दुसरा रंग असेल तर ही बाब लवकर लक्षात येणार नाही. विमानाच्या यंत्रणेतील एक छोटासा बिघाडसुध्दा खूप मोठी हानी करु शकतो, म्हणून ऑईल गळतीचे प्रकार, एखादा क्रॅक लवकर लक्षात येण्यासाठी विमानाला पांढरा रंग वापरला जातो.

विमानाला नेहमी वेगवेगळ्या हवामानाचा सामना करावा लागतो. कधी कडक ऊन, कधी जोरदार वारा, कधी पाऊस अशावेळी इतर रंग लवकर फिके होतात, याउलट पांढरा रंग हा लवकर फिका होत नाही. त्यामुळे विमान कंपन्यांचा विमानाच्या रंगरंगोटीवरील खर्च वाचतो. हे देखील विमानाच्या पांढऱ्या रंगामागचे कारण सांगितले जाते. ❖

# हसा मुलांनो हसा



शिक्षक : साडेतीनशे रुपयात एक डझन आंबे आले, तर एक आंबा कसा पडला ?
विद्यार्थी : सर, पिशवी फाटली असेल.

---

लीलाकाकू : (दुकानदाराला) काय रे! तेल तर दिलं; पण त्यावर लिहिलेलं ते फ्री नाही दिलंस.
दुकानदार : अहो काकू, याच्यावर काहीही फ्री नाहीये...
लीलाकाकू : मला वेड्यात नको काढूस.... याच्यावर ठळक अक्षरात लिहिलंय, कोलेस्ट्रॉल फ्री....

---

महादू काका : अरे व्वा! काय भन्नाट गोल केलाय कोहलीने!
बाळू काका : अरे वेड्या....! गोल या खेळात नसतो, तो क्रिकेटमध्ये असतो.

---

शिक्षक : बंडू, उभा राहा, सांग ५५ भागिले ११, बरोबर किती ?
बंडू : ५
शिक्षक : बाकी ?
बंडू : बाकी काही नाही, बस चाललंय निवांत.

दुकानदार : मॅडम, काय झालं मोबाईलला ?
मॅडम : माझ्या मोबाईलमध्ये नेटवर्कच येत नाहीये.
दुकानदार : अहो, हे खराब हवामानामुळे होतंय.
मॅडम : मग एक चांगल्या हवामानाचं नेटवर्क टाकून द्या ना.

---


बाबा : काय रे कसा होता आजचा पेपर.... ?
मुलगा : पेपर खूप छान होता. पण त्यात दिलेले प्रश्न खूप अवघड होते.

---

इंग्रजीचे शिक्षक : गण्या इट (it) केव्हा वापरतात ?
गण्या : घर बांधताना....!

---

शिक्षक : काय झालं पप्पू ? नुसताच बसलाय काय, पेपर लिही लवकर.
पप्पू : सर! माझा मित्र आला नाही अजून.
शिक्षक : त्याची नको चिंता करु. तू तुझं काम कर.
पप्पू : त्याच्या भरवशावर तर पेपर द्यायला आलोय.



बाबा : काय रे तुझ्या वर्गात सगळे पास झाले का ?
चंदू : हो, आम्ही सगळे पास झालो; पण आमच्या मॅडम मात्र नापास झाल्या.
बाबा : काय, अरे त्या कशा नापास होतील ?
चंदू : हो बाबा, त्या अजून त्याच वर्गाला शिकवताहेत...

टीचर : मायक्रोसॉफ्ट एक्सेल म्हणजे काय ?
बंड्या : जसं सर्फ एक्सेल कपडे धुण्यासाठी वापरतात, तसं मायक्रोसॉफ्ट एक्सेल कॉम्प्युटर धुण्यासाठी वापरतात.

शिक्षक : सांग बरं पिंट्या, मोटारसायकलला किती चाकं असतात ?
पिंट्या : सहा.
शिक्षक : कसं काय ?
पिंट्या : चार मोटारची आणि दोन सायकलची....



शिक्षक : बन्या, अंड्यातून कोंबडीचं पिल्लू कसं बाहेर येतं, सांग पाहू.... ?
बन्या : पण सर ते अंड्याच्या आत घुसलंच कसं ते आधी सांगा ?

जिलेबी विक्रेता : बटाटे घ्या, बटाटे...
ग्राहक : अहो, ही तर जिलेबी आहे ना....!
दुकानदार : हळू बोला, नाहीतर माशा गोळा होतील ना....!

टीचर : पिंकी, सांग बरं कोणता पक्षी उडू शकत नाही ?
पिंकी : मेलेला




शिक्षक : मुलांनो! ओला दुष्काळ आणि सुका दुष्काळ यात काय फरक आहे ?
मंत्र्याचा मुलगा : सर, सुका दुष्काळ असला, की माझे वडील कारमधून फिरतात आणि ओला दुष्काळ असला की हेलिकॉप्टरमधून फिरतात.

शिक्षक : समजा, यमराज तुमच्याकडे आले आणि त्यांनी तुम्हाला तुमची शेवटची इच्छा विचारली तर तुम्ही काय सांगाल ?
बन्या : मी सांगेन, आमच्या सरांना पण सोबत घेऊ या.
शिक्षक : मूर्खा, मी कशाला हवाय ?
बन्या : सर मग तिथे मला कोण शिकवणार ? माझा अभ्यास बुडेल ना !

गिऱ्हाईक : काय रे ! तू दोन कलिंगडं हाताने चापटी मारुन बाजूला ठेवली आणि तिसरं कलिंगड त्या गिऱ्हाईकाला दिलं, तुला खरंच कळलं का, की आत चांगलं आहे म्हणून ?
कलिंगडवाला : गिऱ्हाईकावर इंप्रेशन मारण्यासाठी आम्ही तसं करतो साहेब !

कमळाबाई : काय गं स्वाती, हल्ली मोठ्या लोकांकडे गेलं, की ग्रीन टी पुढ्यात ठेवला जातो, ही मॉडर्न फॅशन आहे की काय ?
स्वाती : तसं काही नाही हो, ग्रीन टी ला साखर, दूध लागत नाही. शिवाय बिस्किटांचाही खर्च वाचतो.



# शिवरायांचे कैसे बोलणे ...

छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्व अलौकिक होते. त्यांच्या वागण्या-बोलण्यातून त्यांचे व्यक्तिमत्व झळकत असे.

शिवरायांचे तेच गुण इतरांवर प्रभाव टाकत. ते जसे बोलत तसे वागत. महाराजांना गरीब, प्रामाणिक माणसांचा कळवळा असे. त्यांच्यावर झालेले अन्याय, अत्याचार ते सहन करीत नसत. शिवरायांनी प्रजेच्या हृदयात स्थान मिळवले होते. म्हणूनच शिवरायांसाठी सदैव प्राण अर्पण करण्याची तयारी असलेले निष्ठावंत सेवक निर्माण झाले.

एकदा शिवरायांची कीर्ती ऐकून गोवळकोंड्याच्या कुतुबशाहने त्यांना भेटीचे आमंत्रण दिले.

शिवरायांना आपल्या प्रचंड वैभवाचे दर्शन घडवून त्यांना कमीपणा आणायचा असा बेत त्याने मनात आखला होता. महाराजांच्या तुलनेत कुतुबशहाचे वैभव आणि साम्राज्य मोठे होते. शिवराय गोवळकोंड्याला गेल्यावर कुतबशहाने त्यांचे स्वागत केले. नंतर त्यांना हत्तीखाना दाखवला. हत्तीखान्यात शेकडो हत्ती रांगेत उभे होते. कुतुबशहाने महाराजांना विचारले, “तुमच्याकडे किती हत्ती आहेत?” महाराजांना त्यांचा विचारण्याचा भाव लक्षात आला. त्यावर ते धूर्तपणे म्हणाले, “आमच्या सर्व लढाया डोंगर दऱ्यात होत असतात. त्यामुळे आम्हाला हत्तींचा उपयोग होत नाही. मात्र हत्तीचं बळ असलेली हजारो माणसं आमच्याकडे आहेत.”

कुतुबशहासुध्दा काही कमी नव्हता. त्याने महाराजांना पटकन प्रतिप्रश्न केला, “मग असा एखादा माणूस बरोबर आणलाय का?” येसाजी कंक महाराजांच्या शेजारी उभा होता. त्याच्याकडे हात करीत महाराज म्हणाले, “हा पण त्यापैकीच एक आहे.”

येसाजी कंकची किरकोळ शरीरयष्टी पाहून कुतुबशहा मनात हसला. महाराजांना अडचणीत टाकण्याची त्याला संधीच हवी होती. त्याने महाराजांच्या परवानगीने पिसाळलेल्या हत्तीशी येसाजी कंकला झुंज घेण्यास सांगितले. येसाजीने अवघ्या दोनच मिनिटात हत्तीची सोंड कापली. चित्कार करीत हत्ती जमिनीवर आडवा झाला. कुतुबशहा थक्कच झाला. त्याने आपल्या गळ्यातील सोन्याचा हार येसाजी कंकला बक्षीस दिला. ते बक्षिस कुतुबशहाला परत करीत येसाजी म्हणाला, “माझ्या गुणांचं कौतुक करायला आमचे महाराज समर्थ आहेत.”

अशी निष्ठावंत आणि स्वाभिमानी माणसं महाराजांच्या गुणांमुळे तयार होऊ शकली. मुरारबाजीलाही दिलेरखानाने जहागिरीची लालूच दाखवली होती. पण ‘आमच्या शिवरायांची मीठ-भाकरीच आपल्यासाठी लाख मोलाची आहे’ असे त्याने ठणकावून सांगितले.

अशा संपन्न व्यक्तिमत्व असलेल्या महाराजांचे गुण अंगी धारण करण्याबाबत समर्थ रामदास स्वामी संभाजी महाराजांना एका पत्रात लिहितात -

शिवरायांचे कैसे बोलणे। शिवरायांचे कैसे चालणे।
शिवरायांचे सलगी देणे। कैसे असे।

काय होण्यासाठी आलो होतो आपण आणि काय होऊन बसलो!
कुठे मंदिरं बनवली तर कुठे मशिदी बनवून बसलो.
आपल्यापेक्षा तर ते कबुतर आहेत अधिक चांगले,
कधी मंदिरावर जाऊन बसले, तर कधी मशिदीवर जाऊन बसले.

# अंतराळ संशोधनातील भारताचे पहिले पाऊल

भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंच्या दूरदृष्टीतून देशाला तंत्रज्ञानाच्या बाबतीत प्रगतीपथावर नेण्यासाठी डॉ. होमी भाभा, डॉ. विक्रम साराभाई यासाख्या तरुण शास्त्रज्ञांना त्यांनी प्रेरित केले आणि त्याचेच फलित म्हणजे भारताचे डॉ.होमी भाभांच्या नेतृत्वाखाली साकारलेले अणुधोरण आणि डॉ. विक्रम साराभाई यांच्या विचारमंथातून झेपावलेले अंतराळ संशोधन धोरण आणि प्रकल्प!


डॉ. विक्रम साराभाई यांना भारतीय अंतराळ संशोधन संस्थे (इसरो) चे जनक मानले जाते. त्यांनी भारताला अंतराळात स्वावलंबी बनवण्याचे स्वप्न पाहिले. १९६२ मध्ये, साराभाईंनी भारतीय राष्ट्रीय अंतराळ संशोधन समिती (INCOSPAR) ची स्थापना केली. ही भारतातील अंतराळ संशोधनाची पहिली अधिकृत संस्था होती. साराभाई त्याचे अध्यक्ष होते. उद्योजक कुटुंबात जन्मलेल्या साराभाई यांनी केंब्रिज विद्यापीठात उच्च शिक्षण घेऊन परतल्यानंतर भारतीय विज्ञान संस्थेत सी.व्ही. रमण यांच्या मार्गदर्शनाखाली वैश्विक किरणांचा अभ्यास केला. पुढे साराभाई यांनी अहमदाबादमध्ये भौतिक संशोधन प्रयोगशाळा सुरु केली. मात्र याच सुमारास त्यांना अंतराळ कार्यक्रम खुणावू लागला होता. त्यासाठी त्यांनी देशातील शास्त्रज्ञ आणि अभियंते हेरण्यास सुरुवात केली. साराभाई यांनी स्वत: मुलाखत घेऊन काही शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांची निवड केली. त्यांनी या नव्या दमाच्या शास्त्रज्ञ, अभियंत्यांना प्रशिक्षणासाठी अमेरिकेच्या 'नासा' मध्ये पाठविले. तिथे त्यांना वर्षभर प्रशिक्षण मिळाले. त्यात माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम, आर. आरवमुदन, रामकृष्ण राव, प्रकाश राव, पी.पी. काळे, एस. मूर्ती, ईश्वरदास इ. समावेश होता. याच दरम्यान केरळच्या थुंबा येथे आंतरराष्ट्रीय अग्निबाण अणुविज्ञान कार्यक्रमाचे जनक होमी भाभा यांनी त्यासाठी मोलाचे सहकार्य केले होते.

केरळच्या किनाऱ्यावरील थुंबा या गावाकडे जगाचे लक्ष असण्याचे शास्त्रीय कारण आहे. ते म्हणजे हे गाव चुंबकीय विषुववृत्तावर वसले आहे. हे विषुववृत्त भौगोलिक विषुववृत्ताहून वेगळे आहे. चुंबकीय विषुववृत्तावर लोहचुंबकाची सुई टांगली तर ती न कलता आडवी राहते. अंतराळ शास्त्रज्ञांच्या जिज्ञासापूर्तीचे व संशोधनाचे साधन म्हणून 'थुंबा इक्वेटोरियल लॉंचिग स्टेशन' ची (टल्स) स्थापना झाली. तेथे कामासाठी सेंट मॅगडेलिन्स चर्चची एक जुनी इमारत होती. त्या ठिकाणी अग्निबाणाची जुळवणी करण्यात येत असे. एक मोठा हॉल, मध्ये प्रशस्त कॉरिडॉर, त्याला दोन मीटर उंच भिंती आणि त्याच्यामागे पार्टिशन घालून लोकांना बसण्याची जागा. पाऊस पडायला लागला, की बाहेरचे सरडे, कीटक, साप यांसारखे प्राणी आत यायचे. काही दिवसांनी गोठ्यात प्रयोगशाळा स्थापन करण्यात आली. चर्चच्या बिशपचा तो गोठा होता. सगळीकडे झाडे-झुडपे वाढलेली होती. ती आधी साफ करुन घेतली. घन प्रणोदकाची प्रयोगशाळा उभारली गेली. अनेक देशात घन प्रणोदकांच्या (इंधन) ज्या प्रयोगशाळा होत्या, त्या वातानुकूलित, ठराविक सापेक्ष आर्द्रता असलेल्या, सुरक्षेसाठी विशेष सुविधा असणाऱ्या असतात. आणि येथे? कसलीच सुरक्षा काही नाही. चक्क उघड्या खलबत्त्यात रसायने घालून ते घोटत असत. त्यावेळी

काही अपघात झाला नाही, स्फोट झाला नाही हे नशीबच म्हणायचे. केरळ मध्ये मुसळधार पाऊस सुरु झाला, की सगळी प्रयोगशाळा हादरायची. भिंती ओल्या व्हायच्या. झंझावाती वारा आत शिरायचा आणि तेथील सर्व जण जिवापाड जपत असलेल्या एका फळ्यावर लिहिलेला संदेश वाऱ्याबरोबर आत आलेल्या पावसाने धुवून जायचा. थोडी उघडीप झाली, की तेथील काम करणाऱ्यांपैकी कोणीतरी पुन्हा त्याच उत्साहाने त्या फळ्यावर लिहायचे, 'टू स्ट्राइव्ह, टू सीक, टू फाइंड अँड नॉट टू यील्ड' म्हणजेच झगडत राहा, काहीतरी मिळवण्याचा प्रयत्न करा. नित्य नव्याचा शोध घेत राहा आणि आपल्या ध्येयाची कास सोडू नका. शरण जाऊ नका, हार मानू नका.

कार्यालयापासून साधारणपणे एक किलोमीटर अंतरावर समुद्रकिनाऱ्यावर अग्निबाण प्रक्षेपित करायची सुविधा होती. या सुविधेत प्रक्षेपणाची दिशा व जमिनीशी होणारा कोन बदलता येत असे. अरबी समुद्राच्या दिशेने अग्निबाण प्रक्षेपित केला जाई. त्या वेळेस भारतात जे तंत्रज्ञान होते, ते दारुगोळा बनवणाऱ्या (ऑर्डनन्स) फॅक्टरीमध्ये होते. तेव्हा आपल्या ऑर्डनन्स फॅक्टरीमध्ये कोणतेही अचूक दिशादर्शक किंवा नियंत्रित क्षेपणास्त्र (मिसाइल) बनवले जात नव्हते. सगळीच अंदाजाने जाणारी होती. त्याचे वजन सुमारे १० किलोग्रॅमचे. इस्त्रोचे स्वप्न उपग्रह अंतराळात सोडण्याचे होते आणि त्या अग्निबाणाचे वजन काय असणार होते? तब्बल १७ टन म्हणजे १७००० किलोग्रॅम. सगळ्यात मोठी म्हणजे १ मीटर व्यासाची मोटर तयार होणार होती ती अग्निबाणाच्या पहिल्या टप्प्याची. तिचे वजन असणार होते दहा टनांचे. त्यावेळी फक्त दहा किलोग्रॅम क्षमतेची तयारी होती इस्त्रोची!

कोणाच्या अध्यात-मध्यात नसलेले थुंबा हे गाव, पाहता पाहता अंतरिक्ष जगताच्या नकाशावर नोंदले गेले. २१ नोव्हेंबर, १९६३ या दिवशी अमेरिकी बनावटीचा नाइके अपाचे नावाचा अग्निबाण प्रक्षेपित करण्यात आला. प्रक्षेपण यशस्वी झाले, अग्निबाणाच्या दाट



थुंबामधील इस्त्रोचे पहिले कार्यालय

धुराच्या ढगाने थुंबाच्या पहिल्या प्रक्षेपणाच्या यशाची नांदी दणाणून दिली आणि साऱ्या शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञांनी एकमेकांना मिठ्या मारुन आनंद व्यक्त केला. हा सोडलेला अग्निबाण अमेरिकन बनावटीचा असला तरी भारतातून तो सोडला गेला हे महत्त्वाचे होते. थुंबा येथे अग्निबाण (रॉकेट) प्रक्षेपणाची सुविधा उभारली गेली होती. या रॉकेटची बांधणी, जुळवणी आणि प्रक्षेपणाची आखणी ईश्वरदास यांनी, तर सुरक्षाबाबतच्या गोष्टींचे प्रमुख अब्दुल कलाम होते. पहिला अग्निबाण तळापर्यंत बैलगाडीने आणला गेला होता. ज्यावेळी ते रॉकेट प्रक्षेपणाच्या ठिकाणी लावताना तेथील क्रेनमध्ये बिघाड झाला त्यावेळी साऱ्या नवतरुण शास्त्रज्ञांनी हातांनी रॉकेट उचलले आणि प्रक्षेपण तळावर योग्य ठिकाणी बसवण्यात यश मिळवले.

अंतराळ कार्यक्रमाची पायाभरणी करण्यासाठी १९६५ मध्ये साराभाईंनी थुंबा येथेच अंतराळ व तंत्रज्ञान केंद्र स्थापन केले. अशाप्रकारे १५ ऑगस्ट १९६९ रोजी भारतीय अंतराळ संशोधन संस्थेची (ISRO) स्थापना झाली. ❖

– सुकदेव पाटील (कल्याण)



# योग्य पर्याय निवडा

१) लीप वर्ष दर ..... वर्षांनी येतं - पाच / चार

२) छ.शिवाजी महाराजांचे जन्मस्थान - शिवनेरी / रायगड

३) विद्युतधारा मोजण्याचं एकक - डेसिबल / अँपियर

४) अंबोली हे थंड हवेचे ठिकाण या जिल्ह्यात आहे - सिंधुदुर्ग / रायगड

५) भारताचे राष्ट्रीय प्रतीक - शिवमुद्रा / अशोकस्तंभ

६) भारतात सर्वात जास्त बोलली जाणारी भाषा - हिंदी / मराठी

७) मराठी राजभाषा दिन - २८ फेब्रुवारी / २७ फेब्रुवारी

८) भारतातील सर्वात लहान राज्य - गोवा / आसाम

९) सूर्यप्रकाश पृथ्वीवर पोचण्यास लागणारा वेळ - ८ मिनिटांहून अधिक / ८ मिनिटांपेक्षा कमी

१०) मनुष्याच्या शरीरातील हाडांची संख्या - २१० / २०६

११) पृथ्वीवरील एकूण महासागर - पाच / सहा

उत्तरे इतरत्र

१२) धर्मशास्त्रानुसार ८४ लक्ष जीवयोनीनंतर हा जन्म मिळतो - देव / मनुष्य

१३) तारखेप्रमाणे शिवजयंती या दिवशी साजरी केली जाते - १८ फेब्रुवारी / १९ फेब्रुवारी

१४) संत रोहिदासांचे गुरु हे होते - संत कबीर / रामानंद स्वामी

१५) विष्णू वामन शिरवाडकर यांचे टोपण नाव - गोविंदाग्रज/ कुसुमाग्रज



# आरोग्यदायी : मुळा

हिवाळ्यात बाजारात हमखास आढळणारी आरोग्यदायी भाजी म्हणजे मुळा.

मुळ्यापासून पराठे, लोणचे, कोशिंबीर, सलाड असे पदार्थ बनवले जातात, तर पाल्यापासून भाजी बनवतात. मुळ्याचा उग्र वास बऱ्याच जणांना आवडत नाही; परंतु त्याचे औषधी गुणधर्म पाहिल्यावर हिवाळ्यात मुळ्याचे सेवन केलंच पाहिजे.

☞ पचनक्रिया सुधारते : मुळ्यामध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे पचनक्रिया सुधारते व पोट निरोगी राहते. बद्धकोष्ठता होत नाही.

☞ मुतखड्यावर लाभदायक : मुळ्यातील कॅल्शियम ऑक्सालेट हे मुतखडा शरीरातून बाहेर काढण्यास मदत करते.

☞ मधुमेही व्यक्तींसाठी : मुळा हा अँटीडायबेटिक स्वरुपात काम करतो. यातील अँटिऑक्सिडेंट आणि एनर्जी मेटाबोलिझम अधिक चांगले करण्यास, ग्लुकोज नियंत्रित करण्यास आणि आतड्यातील ग्लुकोज अवशोषण कमी करण्यास मदत करते. मुळाच नाही तर मुळ्याची पानं देखील यात लाभदायक ठरतात. मुळ्यामध्ये विटामिन सी भरपूर असल्याने इन्सुलिनवर प्रभावी ठरते.

☞ सर्दीसाठी : मुळ्यामध्ये कंजेस्टीव्ह गुणधर्म असतात ते घशातील श्लेष्मा साफ करतात. म्हणून हिवाळ्यात होणाऱ्या सर्दीपासून काही काळ आराम मिळू शकतो.

☞ प्रतिकारशक्ती वाढते : मुळ्याच्या सेवनाने प्रतिकारशक्ती वाढते. अँटीऑक्सिडेंट हृदयाला निरोगी ठेवतात. शिवाय यात ए.सी. इ.डी.बी-६, पोटॅशियम आणि इतर खनिजे भरपूर असतात.

☞ रक्तदाबावर नियंत्रण : मुळा शरीरात सोडियम व पोटॅशियम संतुलित राखून रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास मदत करतो म्हणून उच्च रक्तदाब असणाऱ्यांनी मुळा अवश्य खावा.

☞ त्वचेसाठी : मुळ्यामध्ये फॉस्फरस आणि जस्त असते. यामुळे त्वचेचा कोरडेपणा कमी होतो. पुरळपासून मुक्तता होते. मुळा नियमित खाल्ल्यास हिवाळ्यात त्वचा चमकदार होण्यास मदत होते.

☞ दात आणि हिरड्यांसाठी : मुळ्याचा दोन ते तीन चमचे रस तीन मिनिट तोंडात फिरवावा. नंतर तो थुंकून चूळ भरावी. त्याच्याने हलणारे दात आणि हिरड्या मजबूत होतात.

☞ दक्षता : मुळा खाण्याचे जसे फायदे आहेत तसे तोटेही आहेत.

☞ कमी रक्तदाब असणाऱ्यांनी जास्त मुळा खाणे टाळावे.

☞ थायरॉईड असणाऱ्यांनी मुळ्यांचे सेवन करु नये. जर करायचे असेल तर शिजवून घ्यावा. मुळ्यामध्ये आढळणारे गोविट्रोजन नावाचे संयोग थायरॉईड ग्रंथीला नुकसान पोचवू शकते.

☞ रात्रीच्या जेवणात मुळ्याचे सेवन करु नये. त्यात लोहाचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे शरीरात वेदना वाढू शकतात.

☞ मुळा इतर भाज्यांमध्ये मिसळून सलाड बनवून खाल्ल्यास अधिक फायदा होतो.

☞ सांधेदुखी आणि हाडांचे विकार असेल तर मुळा कमी प्रमाणात सेवन करावा. गर्भवती महिलांनी मात्र मुळा खाणे टाळावे.

☞ लो शुगर असणाऱ्यांनी मुळ्याचे सेवन करु नये. ❖





# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालरा







हूं!!! मस्त, मला रोज हेच खायला आवडेल आई.
पाहिलंस बेटा, घरात बनवलेलं अन्न न खाण्याचा परिणाम. पडलीस ना आता आजारी!
हो आई
आता तुला, आम्हा सगळ्यांना खाव्वंच लागेल.



आम्ही सर्व तुझे मित्रच आहोत. तू लवकर बरी व्हावीस असं आम्हाला वाटतं
पण आई तर सांगत होती, की काही दिवस मला कडू औषधं घ्यावी लागतील.
जर तू आमचं ऐकलंस तर लवकर बरी होशील
पण ते कसं ?
हे बघ मी आहे दूधी. विटामीनची खाण आणि पचयास देखील छान !
हो दुधी ! आईदेखील तुझ्याबद्दल हेच सांगत असते.


मला खाल्याने तुझ्या डोळ्यांचे आरोग्य वाढेल.
आम्ही सर्वजण फारच पौष्टिक आहोत.
आई ! आजपासून मी सर्व भाज्या खाईन आणि तुला कधीच तक्रार करण्याची वेळ येऊ देणार नाही.



# चतुर कबुतर

एकदा एक शिकारी जंगलामध्ये शिकार करण्यासाठी गेला. खूप प्रयत्न केल्यानंतर त्याच्या जाळ्यामध्ये एक कबुतर अडकलं. शिकारी खूप खूश झाला. तो कबुतराला घेऊन घरी निघाला. जाळ्यात अडकल्यामुळे कबुतर खूप घाबरलं होतं. तसं ते खूप चतुर होतं. त्याने शांतपणे विचार केला, आपलं मरण तर निश्चित आहे; पण आपल्याला का पकडलंय हे तर विचारुन पाहू या!

कबुतर शिकाऱ्याला म्हणालं, "शिकारी दादा, तू मला का बरं पकडलंस? मी तुझं काय वाईट केलंय?" शिकारी हसत हसत म्हणाला, "मी तुला मारुन खाणार आहे." कबुतराचा अंदाज खरा ठरला, तरीही थोडा वेळ ते शांत राहिलं. मग शांतपणे विचार करुन ते पुढे म्हणालं, "हे बघ दादा, मला जेवढं जगायचं तेवढं मी जगून घेतलेलं आहे. आता मला जास्त जगायची इच्छा देखील नाही; परंतु मरण्याच्या आधी मी तुला काही शिकवण देऊ इच्छितो, नाहीतर मी मेल्यानंतर माझं ज्ञान माझ्याकडेच राहून जाईल. म्हणून लक्ष देऊन ऐक आणि ती शिकवण नेहमी लक्षात ठेव. पहिली

शिकवण अशी आहे, की कोणाच्या बोलण्यावर विचार न करता चटकन विश्वास ठेवू नकोस. दुसरी शिकवण अशी आहे, की तुझ्या बाबतीत काही वाईट घडलं किंवा काही गोष्टी हातून निसटून गेल्या तर त्याच्यासाठी कधी दु:खी होऊ नकोस.''

''ठीक आहे'' असं म्हणत शिकारी पुढे चालू लागला. थोड्या वेळाने कबुतर परत म्हणालं, ''मी तुला अशी एक अनमोल वस्तू देऊ शकतो, ज्यामुळे तू एका रात्रीत श्रीमंत होशील. तुला असं वणवण भटकावं लागणार नाही.''

शिकारी पटकन थांबला आणि विचारु लागला, ''सांग सांग, मला तू काय देऊ शकतोस?''

''खूप दिवसांपूर्वी राजमहालाजवळ मला एक हिऱ्यांचा हार मिळाला, तो मी एके ठिकाणी लपवून ठेवलेला आहे. जर मी मरुन गेलो तर तो हिऱ्यांचा हार असाच व्यर्थ पडून राहील. म्हणून मी विचार करतोय, की तो हार तुला दिला तर तुझी गरिबी संपेल. तुला हार हवा असेल तर चल माझ्या मागे. मी तुला ते ठिकाण दाखवतो. एकदा का तो हार मी तुझ्या हाती सोपवला, की मग मी खुशाल मरायला मोकळा आहे.''

हे ऐकताच शिकारी म्हणाला, ''हो हो, चल लवकर!'' कबुतर म्हणालं, ''अरे पण असं जाळ्यात अडकून मला रस्ता कसा दिसणार? मी ज्या दिशेने उडत राहीन तू माझ्या मागे मागे येत राहा.'' शिकारी म्हणाला, ''अरे हो! मी तर विसरुनच गेलो.'' शिकाऱ्याने काहीही विचार न करता कबुतराला लगेच जाळ्यातून मुक्त केलं. कबुतर उंच झाडावर जाऊन बसलं आणि म्हणालं, ''अरे भल्या माणसा, थोड्या वेळापूर्वीच मी तुला शिकवण दिली होती, की कोणावरही पटकन विश्वास ठेवू नकोस. तरीही तू ती शिकवण विसरलास? खरं तर माझ्याकडे कोणताही हिऱ्यांचा हार नाही; पण तुझ्या लालची वृत्तीमुळे आता मी मुक्त झालोय.''

शिकारी खूप निराश होत दु:ख करु लागला. तेव्हा कबुतर पुन्हा हसत हसत म्हणाल, ''अरे वेड्या, तू माझी दुसरी शिकवणसुध्दा विसरलास?.... आपल्या बाबतीत काही वाईट घडलं किंवा आपल्या हातून काही निसटून गेलं तर त्याचा पश्चाताप करत दु:खी होऊ नको म्हणून!''

शिकारी निमूटपणे निघून गेला.

मित्रांनो, संकटकाळी घाबरुन न जाता शांतपणे विचार करुन परिस्थितीशी दोन हात केले तर त्यातून नक्कीच मार्ग मिळतो. आणि हो.... कबुतराने सांगितल्याप्रमाणे अनोळखी व्यक्तींवर चटकन विश्वास ठेवू नका आणि जीवनात कधी कोणत्या प्रकारचं नुकसान झालं किंवा अपयश आलंच, तर दु:खी होऊ नका. उलट त्यातून शिकवण घेऊन भविष्यामध्ये तशी चूक होणार नाही याची खबरदारी घ्या. ❖

## समदृष्टी

गुरुची दृष्टी ही समदृष्टीची असते. ती फक्त गुणच पाहते. म्हणून जे गुरसिख कोणाचे अवगुण न पाहता केवळ गुणच पाहतात व गुणच ग्रहण करतात, कुणालाही कमी लेखत नाही अशा गुरसिखाला गुरु शिरोधार्थ स्थान देतो.

**- बाबा हरदेवसिंहजी महाराज**

# माणुसकीचं दर्शन



स्वामी विवेकानंदजी भ्रमंती करत करत देवघर या नगरात पोचले. तिथे प्रियनाथ मुखर्जी नावाचे सद्‌गृहस्थ राहत होते. ते स्वामीजींचे प्रशंसक होते. प्रियनाथांच्या विनंतीला मान देऊन स्वामीजी आणि त्यांच्यासोबत असलेले निराजानंदजी त्यांच्या घरी मुक्कामाला थांबले होते. दिवसभर नगरातील भाविक आणि स्वामीजींचे चाहते त्यांना भेटायला येत होते. त्यामुळे दोन दिवसांपासून स्वामीजी घरीच थांबले होते आणि भेटायला येणाऱ्यांना मार्गदर्शन करत होते.

संध्याकाळी फेरफटका मारण्यासाठी स्वामीजी आणि निराजानंदजी चालत-चालत गावाच्या वेशीपर्यंत पोचले. त्याचवेळी त्यांना रस्त्याच्या कडेला एक माणूस विव्हळत पडलेला दिसला. स्वामीजी ताबडतोब त्याच्या जवळ गेले. त्याला अतिसाराचा त्रास होत होता. त्याचे संपूर्ण कपडे खराब झाले होते. त्याला तातडीने उपचारांची आवश्यकता होती. प्रथम त्याला रस्त्यावरुन हलवणे आवश्यक होते; पण त्याला नेणार तरी कुठे? त्यांच्या मनात मुखर्जींच्या घरी नेण्याचा विचार आला; पण ते स्वतःच तिथे पाहुणे म्हणून आले होते. एक रस्त्यावरील अनोळखी आजारी माणसाला प्रियनाथांच्या घरी कसे न्यावे, त्यांना काय वाटेल? अशी त्यांच्या मनात बरीच घालमेल चालू होती.

स्वामीजींचे मन त्या व्यक्तीस तशा परिस्थितीत तिथे सोडण्यास तयार नव्हते. शेवटी त्या निराधार माणसाला मदत करण्याचा त्यांनी निश्चय केला. निराजानंदजींच्या मदतीने त्या माणसाला प्रियनाथांच्या घरी आणले. ज्या खोलीत स्वामीजी उतरले होते तेथील पलंगावर त्याला झोपवले. त्याचे अंग स्वच्छ केले. त्याचे पोट शेकले. त्याला काही औषधंही दिली. थोड्या वेळातच त्या माणसाला बरे वाटू लागले.

स्वामीजी प्रियनाथांकडे जात त्यांची क्षमा मागत म्हणाले, "माफ करा, मी स्वतः तुमच्याकडे पाहुणा असतांना तुमची परवानगी न घेता एका अनोळखी माणसाला घेऊन आलो." हे ऐकताच प्रियनाथांनी स्वामीजींनी जोडलेले दोन्ही हात आपल्या मस्तकी ठेवले. त्यांच्या चरणी नतमस्तक होत ते म्हणाले, "स्वामीजी, आज मला मानवतेची शिकवण प्रत्यक्ष कृतीतून दिली. तुमच्यामधील देवत्वाचं दर्शन आज घडलं. मी धन्य झालो."

संतांनीही म्हटलंय -

जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले।<br>
तोचि साधू ओळखावा, देव तेथेचि जाणावा।

❐ संग्राहक - सुकदेव पाटील (कल्याण)

## स्वातंत्र्यसेनानी, कवयित्री, भारताची कोकिळा

# सरोजिनी नायडू

भारताला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी पुरुषांबरोबरच क्रांतिकारी महिलांनी देखील हातभार लावला. अनेक स्त्रियांनी स्वातंत्र्यलढ्यात मोलाची कामगिरी बजावली आहे. त्यात सरोजिनी नायडू यांचे नाव अग्रस्थानी आहे.

सरोजिनी नायडू यांचा जन्म बंगाली कुटुंबात १३ फेब्रुवारी १८७९ मध्ये हैदराबाद येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अघोरनाथ चटोपाध्याय तर आईचे नाव वरदसुंदरीदेवी होते. त्यांचे वडील एक वैज्ञानिक, डॉक्टर, शिक्षणतज्ज्ञ होते. त्यांनी हैदराबाद येथील निआज कॉलेजची स्थापना केली. पुढे नोकरी सोडून त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतली.




सरोजिनी बालवयापासूनच बुध्दिमान होत्या. त्यांना तेलुगू, इंग्रजी, फारसी आणि बांग्ला या भाषेचे चांगलेच ज्ञान होते. वयाच्या १२ व्या वर्षी त्या मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्या. लहानपणापासून त्यांना कविता लिहिण्याचा छंद होता. बालपणातच आईकडून कविता लिहिण्याची प्रेरणा मिळाली होती. त्यांच्या कविता वाचून लोक प्रभावित होत असत. हैदराबादचे निजाम देखील त्यांच्या कवितेने प्रभावित झाले. त्यांनी सरोजिनी यांना विदेशात अध्ययनासाठी शिष्यवृत्ती दिली. वयाच्या सोळाव्या वर्षी सरोजिनी यांनी किंग्स कॉलेज लंडन येथे प्रवेश घेतला. त्यानंतर केंब्रिज ब्रिटन कॉलेजमधून त्यांनी पुढील शिक्षण प्राप्त केले. सरोजिनी यांचा विवाह गोविंद राजुली नायडू यांच्याशी झाला. विवाहानंतरही त्यांनी लिखाण सुरु ठेवले. त्यांना चार मुलं होती. जयसूर्या, पद्मजा, रणधीर आणि लीलामनी. स्वातंत्र्यसेनानी गोपाल कृष्ण गोखले यांना त्या आपले गुरु मानत. आपली बुध्दी, शिक्षण आणि लिखाणाची ताकद स्वातंत्र्याच्या लढाईत वापरण्याचा सल्ला त्यांना गोखले यांनी दिला. त्यामुळे क्रांतिकारी कविता लिहून त्यांनी स्वातंत्र्याच्या लढाईत आपले योगदान दिले.

१९०५ साली बंगालच्या विभाजनामुळे सरोजिनी नायडू फार व्यथित झाल्या. त्यानंतर त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या कवितेत देशभक्ती, निसर्ग, प्रेम, मृत्यू असे विविध विषय असत. बालकवितांसाठी त्या विशेष प्रसिध्द होत्या. त्यांच्या कविता वाचून वाचक आपल्या बालपणीच्या आठवणीमध्ये रमून जात. त्यांच्या कवितेत बालपणातील खोडकरपणा आढळून येतो. त्यामुळेच त्यांना भारतीय नाईटिंगेल म्हणजेच भारताची कोकिळा असे म्हटले जाते.

सरोजिनी नायडू यांनी मिठाच्या सत्याग्रहात देखील महात्मा गांधीजींच्या सोबत भाग घेतला होता. त्या भारत छोडो आंदोलनात सुध्दा सहभागी झाल्या होत्या. जेव्हा जेव्हा भारतातील महान क्रांतिकारी महिलांची चर्चा होते तेव्हा सर्वात आधी सरोजिनी नायडू यांचे नाव घेतले जाते. हैदराबाद येथील प्लेगच्या साथीत त्यांनी खूप परिश्रम घेऊन जनतेला सर्वतोपरी मदत केली. त्याबद्दल त्यांना कैसर-ए-हिंद सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात आले होते; पण त्यांनी ते जालियनवाला बाग हत्याकांडानंतर ब्रिटिश सरकारच्या निषेधार्थ परत केले.

सरोजिनी नायडू स्वतंत्र भारतात उत्तर प्रदेशच्या पहिल्या महिला राज्यपाल होत्या. कार्यालयात काम करत असताना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन त्यांचा २ मार्च १९४९ ला मृत्यू झाला. त्यांनी आपलं संपूर्ण जीवन देशाला समर्पित केलं. ❖




महात्मा गांधी शांती पुरस्कार



इंदिरा गांधी शांती पुरस्कार



संगीत नाटक अकादमी पुरस्कार

# नेतृत्व पुरस्कार

**आंतरराष्ट्रीय गांधी शांती पुरस्कार :**


भारत सरकारद्वारा आंतरराष्ट्रीय गांधी शांती पुरस्कार भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या नावे दिला जाणारा वार्षिक पुरस्कार आहे. गांधीजींच्या शांती सिध्दांतांना श्रध्दांजली देणे या हेतूने भारत सरकारने हा पुरस्कार २ ऑक्टोबर १९९५ रोजी त्यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त सुरु केला होता. हा पुरस्कार अशा व्यक्ती अथवा संस्थांना दिला जातो, ज्यांनी सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक क्षेत्रांमध्ये अहिंसा आणि गांधीजींच्या इतर तत्त्वांच्या आधारे समाजामध्ये बदल घडवला आहे. या पुरस्कारांमध्ये एक करोड रक्कम, प्रशस्तीपत्र आणि एक उत्तरीय दिले जाते. हा पुरस्कार सर्व राष्ट्र, लिंग आणि समाजामधील लोकांसाठी खुला आहे. प्रथम गांधी शांती पुरस्कार १९९५ मध्ये टांजानिया चे प्रथम राष्ट्रपती ज्युलियस नायरेरे यांना प्रदान करण्यात आला.

**इंदिरा गांधी शांती पुरस्कार :**

हा पुरस्कार भारताच्या माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ दिला जातो. १९८४ मध्ये त्यांची हत्या केली गेली होती. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ स्थापलेल्या इंदिरा गांधी मेमोरियल ट्रस्ट द्वारा १९८६ पासून इंदिरा गांधी शांती आणि निरस्त्रीकरण आणि विकास पुरस्कार विश्वातील अशा व्यक्तीला प्रदान केला जातो, ज्यांनी समाजसेवा, निरस्त्रीकरण अथवा विकास कार्यांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. या पुरस्कारा अंतर्गत २५ लाख रुपये रोख रक्कम, एक स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र दिले जाते. आतापर्यंत एकून २६ व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

**संगीत नाटक अकादमी पुरस्कार :**

हा पुरस्कार संगीत, नाटक, अकादमी या कलाक्षेत्रातील सरकारी संस्थेतर्फे देण्यात येणारा पुरस्कार आहे. विविध कलाक्षेत्रातील कलावंतांना देण्यात येणारा हा एक सर्वोच्च भारतीय सन्मान आहे. १९५२ पासून हा पुरस्कार देण्यात येतो. सन २००९ पासून या पुरस्काराचे स्वरुप १ लाख रुपये रोख, एक मानपत्र, एक शाल व ताम्रपत्र असे आहे. संगीत, नृत्य, अभिनय, इतर पारंपारिक समूह नृत्य, आदिवासी नृत्य, संगीत, अभिनय व कठपुतली यांतील योगदानाबद्दल हे पुरस्कार आहेत. उद्योन्मुख कलावंतांपैकी काहींना शिष्यवृत्ती दिली जाते. ❖



# संत गाडगेबाबा

विदर्भाच्या कुशीत, जन्म डेबूजींचा झाला
अंधश्रध्दा दूर करण्या, क्रांतिसूर्य उगवला

अस्वच्छता रोगराईचा, सर्वत्र अतिरेक झाला
हीन दीन-दुबळ्यांसाठी, पाझर त्यांना फुटला

क्रांतीची ज्योत पेटवूनी, घेतले खापर अन् झाडू
गाव, खेडी, स्वच्छ करुन, लागले रोगराईला गाडू

साक्षरतेचे महत्व पटविले, भजन कीर्तनातून
मानवसेवा हीच ईश्वरसेवा, शिकवली कर्मातून

स्वच्छता करता करता, मने स्वच्छ तयांची केली
शाळा, अनाथालये बांधून, नवी दिशा जनास दिली

क्रांतिकारी विचारांचा, संत लाभला आम्हास नेक
कर्मयोगी गाडगेबाबा, नाव पडले तयांचे नेक

- मनीषा साळुंखे (मीरा रोड)



# गोदावरी - (दक्षिणेची गंगा)

एकेक नदी म्हणजे एकेक संस्कृती होय! प्राचीन काळापासून नद्या मानवी जीवनाशी समरस झालेल्या आहेत. आज अस्तित्वात असलेल्या मानवी संस्कृतीला नद्यांनी खऱ्या अर्थाने विकसित केले आहे.

गोदावरी नदीचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक. सामाजिक आणि कृषिविषयक जडण घडणीत बहुमोल योगदान लाभले आहे. अशी ही गोदावरी-महाराष्ट्राची अस्मिता बनलेली आहे. गोदावरी खऱ्या अर्थाने महाराष्ट्राची धारिणी, संजीवनी ठरलेली आहे आणि जीवनदायिनी तर आहेच आहे. महाराष्ट्राला सुजलाम् सुफलाम् बनविणारी ही प्रवाहिनी अनेकांच्या आनंदाचा केंद्रबिंदू बनलेली आहे.

या पुण्यसरितेने पाणी, सुपीक जमीन याबरोबरच अनेक दृष्टीने अनुकूल अशी परिस्थिती मानवी जीवनाला उपलब्ध करुन दिली आहे. म्हणून ही गौतमी गंगा महाराष्ट्राची 'गंगामाता' बनली आहे. ही भारतातील तिसऱ्या क्रमांकाची व महाराष्ट्रातील पहिल्या क्रमांकाची मोठी नदी आहे. गोदावरीला 'दक्षिणेची गंगा' असेही म्हणतात.

'गोदावरी' नावामागे पुराणातील एक कथा दडलेली आहे. गौतम ऋषींच्या हातून घडलेल्या गोहत्येच्या पापाच्या परिमार्जनासाठी भगवान शंकरांच्याद्वारे या गौतमी गंगेचे आगमन झाले अशी आख्यायिका आहे. गौतम ऋषींच्या तपस्येने प्रसन्न होऊन महादेवांनी आपल्या जटेतून गंगेला मुक्त केले, अशा रीतीने गोदावरी या भूतलावर अवतीर्ण झाली.

गोदावरीचा उगम नाशिकजवळ त्र्यंबकेश्वर येथील ब्रह्मगिरी डोंगरात होतो. त्र्यंबकेश्वराला उजव्या बाजूने प्रदक्षिणा घालून गोदावरी नाशिकजवळ येते त्याठिकाणी गोदावरीचे पात्र उथळ आहे, या प्रवाहात लहानमोठी कुंडे बांधलेली आहेत. गोदाकाठी नाशिकला अनेक मंदिरे बांधलेली आहेत. पंचवटीतील राममंदिर व नारोशंकराचे मंदिर देखणे आहेत. याशिवाय कपालेश्वर, काळाराम ही मंदिरे प्रेक्षणीय आहेत. पश्चिमेस बालाघाटचे डोंगर व पूर्वेकडील दरेकसा टेकड्यांपासून भामरा-गडपर्यंतचा हा मधला भाग 'गोदावरीचे खोरे' म्हणून ओळखला जातो.

गोदावरीची महाराष्ट्रातील लांबी ६६८ कि.मी. असून तिची पूर्ण प्रवाहाची लांबी १४६५ कि.मी. आहे, तिचे प्रवाहक्षेत्र ७८५६४ चौ.कि.मी. आहे. १९५४ मध्ये गोदावरी नदीवर नाशिक जवळ गंगापूर धरण बांधण्यात आले आहे. नाशिक, नगर, औरंगाबाद, नांदेड जिल्ह्यातून वाहत जाणाऱ्या गोदावरीला कादवा, दारणा, प्रवरा, मुळा, पूर्णा आणि प्राणहिता या प्रमुख उपनद्या मिळतात. मांजरा नदी गोदावरीच्या तळखोऱ्यात आंध्रप्रदेशाच्या सीमेजवळ तिला मिळते. महाराष्ट्राबाहेर गोदावरी आंध्रप्रदेशातून वाहत जाऊन बंगालच्या उपसागराला मिळते.

गोदावरीचे खोरे राष्ट्रकूट, सातवाहन, यादव, बहामनी, मराठे, पेशवे, निजाम व इंग्रज यांच्या राजवटीचे साक्षीदार आहे. गोदाकाठ गतकाळात तपोभूमी म्हणून ओळखला जाई. मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामचंद्रांनी पंचवटीत निवास केला होता. पैठणचे संत एकनाथ, पुणतांब्याचे चांगदेव, नांदेडचे गुरु गोविंदसिंह यांना गोदावरीने सर्वतोपरी साह्य केले आहे. नाशिक येथील गोदावरीच्या पात्रातील रामकुंडात सिंहस्थात लाखो भाविक स्नान करतात.

गोदावरीचा प्रवाह नाशिकहून पंचवटीस वळसा घालून पुढे आग्नेयेस जातो. नगर जिल्ह्यात प्रवेश झाल्यानंतर ही नदी पुण्यतांब्यावरुन दक्षिणवाहिनी होते. गोदावरी जेथे जेथे दक्षिणवाहिनी होते तेथे तेथे शंकराची मंदिरं बांधलेली आढळतात. नगर जिल्ह्यात कायगाव जवळ तिला प्रवरा येऊन मिळते. यानंतर गोदावरीचे पात्र रुंदावते व हा प्रवाह पात्र भरुन नांदेडपर्यंत जातो. पुढे तिला मांजरा नदी व महाराष्ट्राच्या पूर्व भागात सिरोंच्याजवळ प्राणहिता नदी येऊन मिळते.

गोदाकाठी नाशिक, पैठण आणि नांदेड ही तीन प्रमुख शहरे आहेत. गोदावरीमुळे नाशिक हे शहर धार्मिक केंद्र बनले आहे. संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण हे गोदावरीच्या काठावरील एक प्राचीन शहर आहे. पैठणला अनेक थोर व्यक्तींची परंपरा लाभली आहे. शालीवाहन, कृष्णदयार्णव, संत एकनाथ, भद्रोजी दिक्षित, गागाभट्ट ही सारी मंडळी पैठणनगरीचीच. पुढे ही नदी नांदेड शहरामधून वाहत जाते. शिखांचे पवित्र क्षेत्र म्हणून या शहराचा उल्लेख केला जातो. येथे गुरु गोविंदसिंहजी यांची समाधी आहे.


गोदावरीने महाराष्ट्राला दिलेली पहिली देणगी म्हणजे नांदूर-मध्यमेश्वर येथील पक्ष्यांचे अभयारण्य. गोदावरी व कादवा यांच्या संगमाजवळ हे अभयारण्य असून येथे सुमारे वेगवेगळ्या २५० ते ३०० जातीचे पक्षी आढळून येतात. गोदावरीची दुसरी देणगी म्हणजे पैठणजवळील जायकवाडी प्रकल्प. या धरणामुळे नगर, संभाजीनगर, परभणी, बीड तसेच नांदेड जिल्ह्यातील सुमारे ३ लक्ष हेक्टर्स जमिनीला त्याचबरोबर पिण्याचाही पाणीपुरवठा होतो. या धरणावर १२ मेगावॅट क्षमतेचे विद्युत केंद्रही उभारले आहे. हे धरण आशिया खंडातील पहिले मातीचे धरण म्हणून प्रसिध्द आहे.

गोदावरीचे खोरे महाराष्ट्राला वरदान ठरले आहे. जलसिंचनाच्या विविध सोयीमुळे व काठावरील सुपीक मातीच्या जमिनीमुळे हा परिसर ऊस, कापूस, तांदूळ व भुईमूग यांच्या भरपूर उत्पादनासाठी पोषक ठरलेला आहे. द्राक्षे, केळी, मोसंबी, संत्री व डाळींब या फळांच्या बागाही या प्रदेशात बहरलेल्या दिसतात. ❖

संकलन - रघुनाथ भागवत (महाड)



## चित्र पूर्ण करुन रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) चार
२) शिवनेरी
३) ॲंपियर
४) सिंधुदुर्ग
५) अशोकस्तंभ
६) हिंदी
७) २७ फेब्रुवारी
८) गोवा
९) ८ मिनिटांहून अधिक
१०) २०६
११) पाच
१२) मनुष्य
१३) १९ फेब्रुवारी
१४) रामानंद स्वामी
१५) कुसुमाग्रज

## शब्दकोडे

### २२७ चे उत्तर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ सा | २ ब | ३ र | म | ती | | ४ ती |
| | दा | | हा | | ५ ती | न |
| ६ रो | म | | दे | | | शे |
| हि | | ७ दे | व | ८ द | र्श | न |
| ९ दा | न | व | | या | | ऊ |
| स | | ना | | १० नं | दी | |
| | ११ ब | ग | दा | द | | १२ सं |
| १३ भा | क | री | | | १४ म | त |




## Download The App

**Sant Nirankari Mission "SNM" App**

The application is available for the iOS & Android smartphones.

Download on the App Store

ANDROID APP ON Google Play

## Scan QR code

Scan QR code to download Sant Nirankari Mission SNM App

For IOS Devices

For Android Devices

**Prescribed Dates 21st & 22nd , Date of Publication: 16th & 17th (Advance Month)**
**Posted at LPC Delhi RMS Delhi - 110006**

| | | |
|---|---|---|
| Registered with the | : | Delhi Postal Regd. No. DL (N) 136/2021-2023 |
| Registrar of Newspaper | : | License No. U (DN) -23/2021-2023 |
| For India Under RNI No. 25672/1973 | : | Licensed to post without Pre-payment |









# NIRANKARI JEWELS

78-84, Edward Line, Kingsway Camp, Delhi, 110009
Near G.T.B. Nagar Metro Station Gate No. 4

011-42870440, 42870441, 47058133
nirankari_jewels@hotmail.com
www.nirankarijewels.com
@nirankarijewelsdelhi
Nirankari Jewels Pvt. Ltd.

Monday Closed

Customer Care : 9818883394